सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. १९ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३१३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राज्यसभा निवडणुकीचे बिगुल वाजले!

## राज्यातील ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ फेब्रुवारी :** केंद्रीय निवडणूक आयोगाने आज (दि. १८) राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, यामध्ये महाराष्ट्रातील ७ जागांचा समावेश आहे. महाराष्ट्रासोबतच ओडिसा, तामिळनाडू, पश्रि्चम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतील रिक्त होणाऱ्या १६ मार्च २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

महाराष्ट्रातून राज्यसभेवर गेलेले सात महत्त्वाचे सदस्य निवृत्त होत असल्याने या जागा रिक्त होत आहेत. यामध्ये शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट)), रामदास आठवले (आरपीआय - भाजप मित्रपक्ष), फौजिया खान (राष्ट्रवादी काँग्रेस (श.प. गट)), रजनी पाटील (काँग्रेस), प्रियांका चतुर्वेदी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), धैर्यशील पाटील (भाजप), भागवत कराड (भाजप)





**रामदास आठवलेचं निश्चित; शरद पवारांच्या निर्णयाकडे लक्ष**

राज्यातून राज्यसभेवरील कार्यकाळ संपलेल्या रामदास आठवले यांचे पुन्हा राज्यसभेत येणे निश्रि्चत मानले जाते, तर शरद पवार पुन्हा राज्यसभेत येणार का याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

प्रियंका चतुर्वेदी आणि फौजिया खान यांच्या पक्षाकडे त्यांना पुन्हा राज्यसभेत पाठवण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही. काँग्रेस नेत्या रजनी पाटील इतर राज्यातून राज्यसभेवर येणार का आणि भागवत कराड, धैर्यशील पाटील यांच्या बाबतीत भाजप काय भूमिका घेणार याकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मतदानासाठी निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या विशेष जांभळ्या स्केच पेनचाच वापर करणे बंधनकारक असेल असे आयोगाने स्पष्ट केले आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २० मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

### असा आहे निवडणूक कार्यक्रम

अर्ज भरण्याची अंतिम तारीख : ५ मार्च २०२६वृत्तपत्र सदस्यता
अर्जांची छाननी : ६ मार्च २०२६
अर्ज मागे घेण्याची मुदत : ९ मार्च २०२६
मतदान दिनांक : १६ मार्च २०२६ (सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत)
मतमोजणी : १६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपासून

## छत्रपती शिवरायांच्या दर्शनावरून परतताना काळाचा घाला; दिव्यातील दोन मित्रांचा भीषण अपघातात मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**भिवंडी, दि. १८ फेब्रुवारी :** भिवंडी तालुक्यातील मराडे पाडा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या दर्शनासाठी दुचाकीने मित्रांसोबत गेलेल्या दिवा येथील दोन मित्रांचा दर्शन घेवून घरी परतताना झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी रात्रीच्या सुमारास वेहळे रोड येथे घडली आहे. या घटनेने दिवा गावात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे.आयुष विजय जाधव (१९) व त्याचा मित्र ऋषिकेश राजेश जाधव (२५) अशी अपघातात मयत झालेल्यांची नावे आहेत. तर या अपघाताची नोंद नारपोली पोलिस ठाण्यात करण्यात आली असून या अपघाताला कारणीभूत ठरलेल्या डंपर चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पत्नी न सांगता नातेवाईकांकडे गेल्यावर तीन महिन्याचा तुरुंगवास

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अफगाणिस्तानातील तालीबान सरकार हे अनेक कारणांनी चर्चेत असतं. आता ते त्यांना नव्या क्रिमिनिल कोडमुळं जगभारत चर्चेत आलं आहे. अफगाणिस्तानातील तालीबान सरकारची महिलांच्या बाबतीत काय भूमिका आहे हे जगाला माहिती आहे. महिलांवर सर्वाधिक बंधने कुठे असतील तर ती तालिबान शासित अफगाणिस्तानात आहेत. दरम्यान, तालीबान सरकारनं नवीन क्रिमिनल कोड सादर केला आहे. त्यात महिला आणि मुलांना देखील शारीरिक शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. तालिबानचे सर्वोच्च नेते हिबतुल्ला अखुनजादा यांनी या क्रिमिनल कोडवर स्वाक्षरी देखील केली आहे. नवीन क्रिमिनिल कोडनुसार आता पती किंवा वडिलांना महिला आणि मुलांना सांगितलेल्या विशिष्ट मर्यादेत शारीरिक शिक्षा करण्याची परवानगी असणार आहे. त्याचबरोबर तालिबानने अजून एक अजब कायदा केला आहे. त्यांनी ज्या महिला आपल्या पतीच्या परवानगीशिवाय नातेवाईकांकडे जातील त्यांना देखील तीन महिन्यापर्यंत तुरूंगवासाची शिक्षा देण्यात येणार आहे.

## पायलटचा वापर, अजितदादांचं विमान मुद्दाम आदळलं अन् मोठा स्फोट घडवला; रोहित पवारांच्या नव्या दाव्याने खळबळ!

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १८ फेब्रुवारी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विविध तर्क-वितर्क लढवले जात असताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुन्हा एकदा खळबळजनक आरोप केले आहेत. अजित पवार यांच्या घातपाताबाबत आम्हाला जो संशय होता तो आता खरा ठरताना दिसत असून त्यांचं विमान पायलटकडून मुद्दा खाली आदळण्यात आले आणि जास्त इंधन भरून मोठा स्फोट घडवून आणला, असा दावा करत रोहित पवार यांनी खळबळ उडवून दिली आहे.

रोहित पवार यांनी आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधत म्हटलं की, अजितदादांच्या विमानाचा इतका मोठा स्फोट का झाला? याबाबतीत आम्ही शंका उपस्थित केली होती ती आता खरी ठरत आहे. या विमानात अधिकचे इंधन टँक होते. हे इंधन टँक कुठे असते तर जिथे विमानात शेवटच्या भागात टॉयलेट असते ते टँक ठेवण्याची जागा असते. त्याच्या मागच्याच भागात ब्लॅक बॉक्स असतो. त्यामुळे आधी कॅन पेटले आणि त्यानंतर विमानाच्या पंखांमध्ये असलेल्या इंधनाने पेट घेतला. विमानाने मुंबईहून उड्डाण घेत असताना त्याचे इंधन टँक पूर्णपणे भरलेले होते. बारामतीला जाण्यासाठी विमानात इतके इंधन का भरण्यात आले होते? त्यामुळे मी आधी म्हटल्याप्रमाणे पायलटचा वापर करून हा घातपात झाला असावा आणि त्या घातपातावेळी स्फोट मोठा होण्यासाठी इंधन जास्त भरण्यात आले, ही जी आमच्या मनात शंका होती, ती आता खरी होताना दिसत आहे, असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला आहे.

विमान अपघाताबाबत विविध शंका उपस्थित करत रोहित पवार यांनी गंभीर आरोप केले आहेत. फ्लाइटचा जो प्लॅन आहे त्यानुसार तुम्हाला लँडिंगसाठी मूळ विमानतळासह आणखी एक पर्यायी विमानतळ द्यावं लागतं. पुणे विमानतळ हे फ्लाइट प्लॅनमध्ये पर्याय म्हणून देता आलं नसेल कारण तिथं सकाळी डिफेन्सच्या विमानाचं लँडिंग होतं. विविध अडचणींमुळे सोलापूरचाही पर्याय देता येत नाही. म्हणजे पुन्हा मुंबई विमानतळाचाच पर्याय तुम्हाला द्यावा लागणार होता. मग आमचा प्रश्न असा आहे की, विमान लँडिंगसाठी किमान दृश्यमानता ही ५००० इतकी असावी लागते जी बारामतीत त्या दिवशी केवळ ३००० इतकी होती, तरी मग मुंबईतून उड्डाण का करण्यात आलं? आणि उड्डाण जरी केलं तरी दृश्यमानता कमी आहे हे कळाल्यावर लँडिंगचा प्रयत्न करायलाच नव्हता पाहिजे, असं म्हणत रोहित पवारांनी हा घातपात असल्याचा दावा केला आहे.










## थोडक्यात...

### निसानकडून नवीन ग्रॅव्हाइटच्या अनावरण

**छत्रपती संभाजीनगर :** निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एनएमआयपीएल) ने आज न्यू निसान ग्रॅव्हाइटची घोषणा केली. त्याची किंमत सुमारे ५.६५ लाख रुपये आहे. एक धाडसी आणि गेम-चेंजिंग ७-सीटर एमपीव्ही, ग्रॅव्हाइट निसानच्या भारतातील प्रवासात एका नवीन अध्यायाची सुरुवात करते. मेड इन इंडिया, मेड फॉर इंडियाने प्रेरित होऊन, ग्रॅव्हाइट हे निसान मोटर इंडियाच्या नवीन उत्पादन मोहिमेअंतर्गत बाजारात आणले जाणारे पहिले उत्पादन आहे - जे कंपनीची भारतातील मजबूत वचनबद्धता आणि उपस्थिती अधोरेखित करते.

### 'सक्षम' उपक्रमाची घोषणा

**पुणे :** पुण्यातील फूड सर्व्हिस आणि हॉस्पिटॅलिटी क्षेत्र विविध नव्या फॉरमॅट्समुळे झपाट्याने विस्तारत आहे. या वाढीसोबतच सुरक्षित कार्यपद्धती, नियमांचे पालन आणि शाश्र्वत पायाभूत सुविधा यांना अधिक प्राधान्य दिले जात आहे. या पार्श्र्वभूमीवर कमर्शियल रेफ्रिजरेशन सोल्यूशन्स क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी एलनप्रोने आज पुणे आवृत्तीतील 'सक्षम' या ज्ञान-आधारित उद्योग उपक्रमाची घोषणा केली. पत्रकार परिषदेत या उपक्रमाचे उद्दिष्ट, उद्योगासाठीचे महत्त्व आणि अपेक्षित परिणाम याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी एलनप्रोचे संचालक श्री. संजय जैन, हॉस्पिटॅलिटी कन्सल्टंट्स फोरम चे अध्यक्ष श्री. पी. श्रवण कुमार तसेच उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.तज्ज्ञांच्या मते, फूड व्यवसाय वेगाने वाढत असला तरी तापमान नियंत्रण, रेफ्रिजरेशन देखभाल आणि ऑडिट तयारी यांसारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये अजूनही सातत्याचा अभाव दिसून येतो.

### २५० ग्रामीण महिला उद्योजकांच्या डिजिटल आणि उत्पन्न क्षमतांना बळकटी दिली

**पुणे :** डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी एक मजबूत पाया रचत, नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोच्या सहकार्याने २५० ग्रामीण महिला उद्योजकांना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले, ज्यामुळे त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत अधिक सक्रियपणे सहभागी होता आले. या कार्यक्रमाचा उद्देश व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि महिलांना भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करणे हा होता.

### क्लीन मॅक्स एन्व्हायरो एनर्जी सोल्युशन्स लिमिटेडचा आयपीओ २३ फेब्रुवारी रोजी उघडणार

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील सर्वात मोठी कमर्शियल आणि इंडस्ट्रियल (सी अँड आय) रिन्यूएबल एनर्जी प्रदाता कंपनी, क्लीनमॅक्सने आपल्या पहिल्या वहिल्या इनिशिअल पब्लिक ऑफर (आयपीओ) साठी १ रुपया दर्शनी किंमत असलेल्या प्रति इक्विटी शेअरसाठी १,००० रुपये ते १,०५३ रुपये किंमत पट्टा निश्र्चित केला आहे.

कंपनीचा इनिशिअल पब्लिक ऑफरिंग (आयपीओ) सबस्क्रिप्शनसाठी २३ फेब्रुवारी २०२६ रोजी उघडेल आणि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.

### तारकासुराच्या अग्नी आणि रोषाला आत्मसात केले

सोनी सबवरील गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय हा शो शिव परिवाराच्या अद्भुत कथा, त्यांचा विश्र्वास, कर्तव्य आणि दिव्य उद्देश यांना जिवंत करतो. कथा आता एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचली आहे, जिथे तारकासुराचा प्रवेश होतो. हा शक्तिशाली पात्र प्रसिद्ध अभिनेता आमिर दलवी साकारत आहेत. तारकासुर ही अशी शक्ती आहे जी केवळ बल किंवा युक्तीने पराभूत होऊ शकत नाही, तर फक्त सर्वोच्च दिव्य ज्ञानानेच हरवली जाऊ शकते. त्याचा प्रवेश कथेत मोठा बदल घडवतो आणि एक गहन आध्यात्मिक व भावनिक संघर्षाची सुरुवात करतो.

### कीटकांच्या गतिशीलतेबद्दल शेतकऱ्यांना महत्त्वाची माहिती

**हिंगोली :** उपक्रमाबद्दल भाष्य करताना, गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या पीक संरक्षण व्यवसायाचे सीईओ राजवेलू एनके म्हणाले: डाळ उत्पादकता सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात यासंबंधीचे ज्ञान वेळेवर मिळणे आवश्यक आहे. मातीची गुणवत्ता, पिकांची संपूर्ण प्रक्रिया आणि कीटकांच्या गतिशीलतेबद्दल शेतकऱ्यांना महत्त्वाची माहिती दिल्याने त्यांना वेळेवर आणि माहितीपूर्ण निर्णय घेण्यास मदत होऊ शकते, विशेषतः सतत बदलत्या कृषी परिस्थितीत.

# गीताबनकला महोत्सवात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## गंगापूर, खुलताबाद, वैजापूर आणि कन्नड तालुक्यातील २०० हुन अधिक शाळेतील तब्बल ३६०० शे विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग; तुर्काबाद जिल्हा परिषद शाळेचा संघ ठरला उत्कृष्ट संघ

**तभा वृत्तसेवा**

**लासुर स्टेशन, दि. १८ फेब्रुवारी :** लासुर स्टेशन येथील गीताबन कला महोत्सव या संस्कृतीक स्पर्धेत गंगापूर, खुलताबाद, वैजापूर आणि खुलताबाद तालुक्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विध्यार्थ्यांनी एका पेक्षा एक सरस गाण्यावर नृत्य करून विविध गटात रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे ११ कलाप्रकारात तब्बल १६३ पारितोषिके पटकावले. विशेष म्हणजे या स्पर्धेत चार तालुक्यातून २०० हुन अधिक शाळांच्या तब्बल ३६०० विध्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

आमदार प्रशांत बंब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १५,१६ व १७ तारखेदरम्यान आयोजित गीताबन कला महोत्सवाचे आयोजन आमदार प्रशांत बंब मित्रमंडळ गंगापूर व खुलताबाद





तसेच परिवर्तन प्रतिष्ठाण लासुर स्टेशन यांच्या वतीने करण्यात येते यंदाचे हे तिसरे वर्ष होते. विध्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धाचे आयोजन करण्यात येत.

यावर्षी वैयक्तिक नृत्य, समूह नृत्य, लावणी, गोंधळ, वैयक्तिक आणि समहू गायन, पोवाडा, रांगोळी, चित्रकला, काव्यवाचन आणि वत्कृव अशा ११ कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी बहारदार आणि एकापेक्षा एक सरस नृत्य सादरीकरण विद्यार्थ्यांनी सादर केले. तीन दिवसीय या कार्यक्रमात त्या त्या वर्ग गटात अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ अशी रोख, स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र अशी पारितोषिके पटकावली. तुर्काबाद येथील पीएमश्री जिल्हा परिषद शाळेने सर्वाधिक ११ही कलाप्रकारात सर्वाधिक २१ पारितोषिके पटकावून छत्रपती संभाजीनगर ग्रामीण उत्कृष्ट संघाचा तिसऱ्यांदा बहुमान मिळवला. या नंतर तोडीसतोड कन्नड आणि गवळीशिवरा, विटावा या शाळेंनी देखील अधिक पारितोषिके पटकावले.

या कार्यक्रमासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शेषरावनाना जाधव, जिल्हा परिषद सदस्या संगीता आमराव, रत्तन बत्तीसे, प्रतीक्षा कापसे कापसे, पंचायत समिती सदस्या कविता चव्हाण, अनिता खंडागळे, सावळीराम थोरात, सुनील पाखरे, संतोष पाटील जाधव, प्रकाश कोकरे, भाजप जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा जयमाला वाघ, तालुका अध्यक्षा शिला गाढे, सरपंच मीना पांडव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप गायकवाड भगवान गाढे, नितीन गायकवाड, शशिकांत सांगवीकर, आनंद कांबळे, रवी इंगळे, संतोष काटखाय, शुभम मढिकर यांनी परिश्रम घेतले.

## वि.हिं.प.मंदिर आयाम आणि श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट वाळूज च्या वतीने 'ओळख पंचांगाची'- कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ फेब्रुवारी :** मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम विश्र्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत आणि श्री साईबाबा मंदिर संस्थान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ ला सायंकाळी ६ वाजता बजाजनगर वाळूज परिसरातील साईबाबा मंदिरात ओळख पंचांगाची या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

दैनंदिन व्यवहारात सर्वसामान्य हिंदूंना पंचांग कसे पहावे हा प्रश्र्न असतो.सर्व हिंदूंना आपली गौरवशाली वैज्ञानिक हिंदू कालगणना माहित व्हावी तसेच पंचांगाच्या पाचही अंगाचे म्हणजेच तिथी वार नक्षत्र योग आणि करण तसेच घरातील व्यवसायातील शुभकार्य करण्याकरता योग्य दिवस कोणता व कसे पाहावे यासंदर्भात या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात येणार आहे या कार्यशाळेत ज्योतिषाचार्य पंडित ऋषिकेश चौधरी गुरुजी मार्गदर्शन करणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योजक श्री राजेंद्र शिरोळे उपस्थित राहणार आहेत. याशिवाय श्री साईबाबा मंदिर ट्रस्ट सचिव श्री.साहेबराव पाथरीकर मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पंचांग वाचन कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे श्री. दामोदर घुगे संजीव तायडे श्री कडूबा रानगोते श्री कुमार नवले यांनी केले आहे.

## शिवजयंतीनिमित्त किल्ल्यावर 'बाल शिवबा-जिजाऊ' यांचे फोटोसेशन

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. १८ फेब्रुवारी :** फेब्रुवारी शिवजयंतीच्या पार्श्र्वभूमीवर छत्रपतींच्या पराक्रमाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी देवगिरी किल्ल्यावर 'बाल शिवबा व जिजाऊ' या ऐतिहासिक संकल्पनेवर आधारित फोटोसेशन दोन दिवसांपासून सुरु आहे.

या उपक्रमात लहान मुलांना बाल शिवबा तर महिलांना जिजाऊ यांच्या वेशभूषेत सजवून ऐतिहासिक वातावरणात छायाचित्रण केले जात आहे.

या फोटोसेशनद्वारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक यांच्या बालपणातील संस्कार, शौर्य आणि राष्ट्राभिमानाची जाणीव मुलांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच मातृशक्तीचे प्रतीक असलेल्या यांच्या संस्कारांची महतीही या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

गडकिल्ल्याच्या पार्श्र्वभूमीवर पारंपरिक पोशाख, तलवार, भगवा ध्वज आणि ऐतिहासिक सजावटीमुळे परिसरात



शिवकालीन वातावरण निर्माण झाले असून छत्रपती संभाजीनगर , खुलताबाद, दौलताबाद येथील अनेक कुटुंब आपल्या मुलांसह शिवजयंती साजरी करण्याचा अनोखा मार्ग निवडला आहे.

लहाण मुलांना शिवचरित्राची ओळख आणि इतिहासाविषयी अभिमान निर्माण करण्यासाठी असे सांस्कृतिक उपक्रम महत्त्वाचे असल्याचे छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.शितल गवळी यांनी सांगितले.

## एमजीएममध्ये 'ग्लिट्झ २ के २६ वार्षिक स्नेह संमेलन संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. १८ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ. जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात 'ग्लिट्झ २के२६' वार्षिक स्नेह संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या संमेलनास अभिनेते प्रविण डाळिंबकर, कुलपती अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ.सारिका शेळके, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्राचार्या डॉ. प्राप्ती देशमुख यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयातील गुणवत्ता विकास आराखडा तसेच एनएसएस व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी केलेली कामगिरी याबद्दल माहिती दिली.

प्रमुख पाहुणे अभिनेते प्रविण डाळिंबकर यांनी आपल्या अभिनय प्रवासातील विविध अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. संघर्ष, सातत्य आणि आत्मविश्र्वास यांच्या जोरावर यश कसे मिळवता येते, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

'ग्लिट्झ २के२६' अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाट्य आणि इतर कलागुणांचे आकर्षक सादरीकरण केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# उंच भरारी घेत सोयगावातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचा कलाविष्कार सोहळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. १८ फेब्रुवारी :** सोयगाव येथील उंच घाट परिसरात वसलेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचा भव्य कलाविष्कार कार्यक्रम उत्साहात व दिमाखात पार पडला. आकर्षक सजावट,रंगीबेरंगी फुगे,रांगोळ्या आणि विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी शाळा खुलून दिसत होती.विशेष आकर्षण ठरलेला सेल्फी पॉईंट उपस्थितांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू ठरला.विद्यार्थ्यांनी नृत्य,गायन,नाटिका,वक्तृत्व आदी विविध कलाप्रकार सादर करत आपले कौशल्य प्रभावीपणे मांडले. कार्यक्रमाला माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष रवींद्र काळे,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य हर्षल काळे, राजेंद्र दुतोंडे,रविंद्र साखळे,अण्णा वाघ,समाजसेवक राजू कुडके,नगरसेवक गजानन कुडके,नगरसेवक संतोष बोडखे,रंगनाथ तेली,रिपब्लिकन सेना तालुकाध्यक्ष अंकुश पगारे,तसेच शंकर जेठे,पत्रकार कृष्णा पाटील,कृषी भूषण शेतकरी अरूण सोहनी,संदीप चौधरी,दत्तू रोकडे,सुरेश घन,अजय नेरपगारे,बापू मानकर, योगेश श्रीखंडे यांची उपस्थिती लाभली.केंद्रातील शिक्षक नरेंद्र बारी,रामदास चंडोल,भास्कर चौधरी,नितेश गव्हादे, महादू पंडीत तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.पालकाकडून कार्यक्रमासाठी तब्बल १६,००० रुपये इतकी बक्षीस रक्कम बक्षिस म्हणून जमा झाली.

मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शाळेचा दैनंदिन शैक्षणिक व भौतिक विकास सातत्याने होत आहे.विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्र्वास व स्पर्धात्मक वृत्ती विकसित होत असून ग्रामस्थांचा शाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.शाळेने सातत्याने तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे.तसेच राज्यस्तरीय 'गौरव किल्ला' सन्मान प्राप्त झाल्याने शाळेचा लौकिक अधिक वृद्धिंगत झाला आहे.परिणामी विद्यार्थी संख्येतही लक्षणीय वाढ होत आहे.



तसेच कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविल्याबद्दल सुरेखा चौधरी, पंकज रगडे, रामचंद्र महाकाळ, प्रतिभा कोळी, सविता पाटील, गणेश बाविस्कर, अकुश काळे, मंगला बोरसे, मंदा म्हस्के,पांडुरंग बारगजे,पूनम कल्याणकर,शुभम देसले,शेख विकार, बिलाल बागवान आदी शिक्षक व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज रगडे व सुरेखा चौधरी यांनी केले.

उंच घाटातील ही शाळा आज शिक्षण,संस्कार आणि गुणवत्ता यांचे आदर्श केंद्र म्हणून उदयास येत आहे. कलाविष्कार सोहळ्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा दिली असून शाळेची प्रगतीची वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहील, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.

# शिवसेना भवन मध्ये जगद्गुरु संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्सव

**तभा वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. १६ फेब्रुवारी :** येथील आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे थोर समाज सुधाकर जगद्गुरू संत श्री सेवलाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते जगद्गुरू संत श्री सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



आ. अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांशी संवाद साधत जगद्गुरू संत श्री सेवालाल महाराज जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी नगराध्यक्ष अब्दुल समीर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेना पदाधिकारी केशवराव तायडे, अर्जुन गाढे, दामूअण्णा गव्हाणे, किशोर अग्रवाल, देविदास पालोदकर, रामदास पालोदकर, शेख सलीम, शंकरराव खांडवे, मुक्ताराम पाटील, शेख रब्बानी, नगरसेवक सुधाकर गायकवाड, रउफ बागवान, बाबू शहा, प्रशांत क्षीरसागर आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.

**कार्यालय नगर परिषद पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर**

Email munptn@gmail.com

जा.क./नपपै/बां.वि./248/2026

दिनांक :- 18/02/2026

**ई-निविदा सुचना जाहिरात**

नगर परिषद पैठण कार्यालया मार्फत जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत (एकुण 01 काम) करणे हे काम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे सुयोग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन B-1 नमुन्यातील निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरील ई-निविदा प्रणालीव्दारे मागवीत आहे. कामाची निविदा दिनांक 18/02/2026 ते दिनांक 26/02/2026 या कालावधीत वरील नमुद संकेत स्थळावर ऑनलाईन दाखल करता येईल. निविदेबाबतची संपुर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

स्वाक्षरीत/-

मुख्याधिकारी

नगर परिषद पैठण

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या हत्या चिंताजनक : अभाविप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** १६ फेब्रुवारी २०२६ रोजी, लातूरच्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात काल सायंकाळच्या सुमारास महाविद्यालयातील विद्यार्थी विक्रम पांचाळ याची एका अज्ञात तरुणाने चाकूने भोसकून हत्या केली. विक्रम पांचाळ हा तंत्रनिकेतन महाविद्यालयातील वसतिगृहात राहणारा विद्यार्थी असून बांधकाम अभियंता या शाखेचे तृतीय वर्षाचे शिक्षण घेत होता. तसेच लातूर जवळील कुंभारवाडी या गावचा तो रहिवासी होता.मागील ४ महिन्यात लातूर शहरात विद्यार्थ्यांची हत्या होण्याची ही पाचवी घटना आहे. लातूरच्या एमआयडीसी परिसरात असलेल्या महिला बीसीए महाविद्यालयात डीएमएलटी प्रथम वर्षामध्ये शिक्षण घेणाऱ्या दोघा विद्यार्थ्यांवर चौघा तरूणांनी काठीने हल्ला केला, ही घटना फ्रेशर्स पार्टीच्या दरम्यान घडली यातच सुरज शिंदे नावाच्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर निलंगा तालुक्यातील आठ विद्यार्थी मागील एका महिन्यापासून अचानक बेपत्ता झालेले आहेत.अशा विविध घटना लातूर जिल्ह्यात सातत्याने घडत आहेत. यामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कायदा व सुव्यवस्था फाट्यावर मारून काही गुंड प्रवृत्तीचे तरुण नशेच्या माध्यमातून अशा पद्धतीचे गुन्हे करत आहेत. प्रशासनाने या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे अशा घटना वारंवार घडतांना दिसून येत आहे. त्यामुळे प्रशासनाने या गुन्ह्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करावी.अशी मागणी अभाविप करत आहे.



## विविध वृत्त...

### ‘संशोधन लेखन मसुदा’ विषयावर एकदिवसीय कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**लातूर :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथील पी.जी. प्रोजेक्ट रिसर्च कमिटीच्या वतीने ‘‘संशोधन लेखन मसुदा’’ या विषयावर एकदिवसीय मार्गदर्शक सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र नुकतेच पार पडले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सतीश लक्ष्मणराव कुंडलवार, सहयोगी प्राध्यापक, शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ यांनी संशोधन लेखनाची रूपरेषा, लेखन पद्धती, संशोधनातील महत्त्वाचे घटक तसेच संशोधन लेख सादरीकरणाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जी.आर. लहाने, डॉ. बी.टी. चव्हाण व डॉ. एम.एस. आष्टेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रस्तावना डॉ. बी.जी. कळंबे यांनी केली. सूत्रसंचालन रेश्मा सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन वर्षा पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. रूपा गिल्डा, डॉ. अनुजा कांबळे, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. साक्षी पाटील, प्रा. सुहाना शेख व प्रा. अमृता बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले. हे सत्र विद्यार्थ्यांसह संशोधन करणाऱ्या अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले असून, संशोधन लेखनाबाबत नवे दृष्टिकोन मिळाल्याची प्रतिक्रिया उपस्थितांनी व्यक्त केली..

### दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, येथे मेगा रक्तदान शिबिर संपन्न

**लातूर :** ‘‘रक्त हेच जीवन’’ या विचाराची प्रचिती देणारे मेगा रक्तदान शिबिर दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे उत्साहात पार पडले. दयानंद शिक्षण संस्था व संस्थेशी संलग्नित आठ महाविद्यालये तसेच एम.व्ही.पी.एम.एलुमनी पुणे यांच्या संयुक्त पुढाकारातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.मानवी जीवनासाठी रक्त हे अमूल्य द्रव्य असून अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती, थॅलेसेमिया व इतर गंभीर आजारांमध्ये रक्ताची तातडीची गरज भासते. कृत्रिमरीत्या रक्ताची निर्मिती शक्य नसल्याने रक्तदान हाच एकमेव पर्याय आहे. ‘‘रक्तदान हीच सर्वश्रेष्ठ मानवसेवा’’ या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी,प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमाचे उद्घाटन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी,सदस्य चैतन्यजी भार्गव,सदस्य सागर मंत्री,डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर चे पदाधिकारी नितीन भराडिया,श्रीकांत करवा उपस्थित होते. संस्थेशी संलग्नित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, डॉ.पुनम नाथानी,डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,डॉ. वाजीद चाउस यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

### विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग आज बंद

**लातूर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गरड यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.

### ‘राजमाता जिजामाता’च्या एम. ए. एज्युकेशनच्या विद्यार्थिनीला सुवर्णपदक

**लातूर :** येथील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी एम.ए. एज्युकेशन मार्च २०२५ परीक्षेत नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. यामुळे ‘लातूर पॅटर्न’च्या यशात मानाचा तुरा रोवला गेला आहे. याबद्दल राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयातर्फे संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते फेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अंतर्गत लातूरच्या राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयात २०२२ पासून एम.ए. एज्युकेशन केंद्र सुरू आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या शिक्षकांना २४ वर्षांची वेतनश्रेणी मिळते. मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आरती पांडुरंग कोल्ले यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत त्या सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत. या यशाबद्दल विद्यापीठात कुलगुरू डॉ. सोनवणे, प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, लेखाधिकारी कटलाकुटे व विभाग प्रमुख डॉ. संजीवनी महाले यांच्या उपस्थितीत दीक्षांत समारंभात सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले. या परीक्षेचा महाविद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयातर्फे आरती कोल्ले यांचे कौतुक करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, एम.ए. एज्युकेशन केंद्राच्या समन्वयक स्वाती केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. विजयकुमार लोहारे, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड आदी उपस्थित होते.

# देशपातळीवर लातूरचा डंका; रिलायन्स लातूर पॅटर्न व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचा JEE Main सत्र-१ मध्ये घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** राज्यात गुणवत्तेची परंपरा जपणाऱ्या Reliance Latur Pattern व श्री त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, लातूर यांनी यावर्षीही अभूतपूर्व यश संपादन करत महाराष्ट्रातील सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे.

NTA द्वारे घेण्यात आलेल्या गएए चरळप २०२६ परीक्षेच्या पहिल्या सत्रात (दि. २१ ते २८ जानेवारी २०२६) देशभरातून सुमारे १४.५० लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धात्मक परीक्षेतून दि. १७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्राप्त निकालानुसार महाविद्यालयातील खालील विद्यार्थी प्रतिष्ठित IIT-JEE Advanced परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.

यामध्ये चि. श्रीनिवास अजमेरा यांनी ९९.०५ पर्सेन्टाइल मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर चि. ह्रिदयांश सोनी (९८.५७ पर्सेन्टाइल) यांनी द्वितीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली.

तसेच चि. सोहम भरोसे (९८.११), चि. सक्षम सोनवणे (९७.९९), चि. ओम लाडेकर (९७.२३), चि. अनमोल खरे (९५.५७) चि. अथर्व जामगडे (९५.१५), चि. देवानंद निकम (९४.६४), कु. स्नेहा ढमाले (९४.३७), चि. श्रेयश दंडनाईक (९३.३२), कु. प्रांजल कांबळे (९२.२५), कु. प्रणाली कुंभार (९१.४७) आदी विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.




या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची शिस्तबद्ध शैक्षणिक पद्धत यांचा मोठा वाटा आहे. इयत्ता दहावीमध्ये अत्यंत सामान्य गुणवत्ता असतानाही अवघ्या दोन वर्षांत देशपातळीवर यश संपादन करणे हीच ‘लातूर पॅटर्न’ची खरी ओळख असल्याचे संस्थाध्यक्ष प्रा. उमाकांत होनराव यांनी सांगितले.

यावेळी संस्थेच्या सचिव तथा प्राचार्या मा. सुलक्षणा केवळराम मॅडम, कोषाध्यक्ष मा. प्रेरणा होनराव, कार्यकारी संचालक श्री. ओंकार होनराव अकॅडेमिक प्रमुख प्रा. संगम खराबे, प्रा. सुनील कुमार वर्मा, प्रा. जितेंद्र कुमार, प्रा. विकास कुमार सोनी, प्रा. मांगीलाल चौधरी, प्रा. रोहित यादव, प्रा. मयंक कुमार, प्रा. सतिष पाटील, प्रा. प्रसाद कुलकर्णी, प्रा. मीरा मुंडे व सर्व प्राध्यापकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

रिलायन्स लातूर पॅटर्न - शाश्वती आदर्श शिक्षणाची !

## अक्षरनंदन व SGP इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** येथील अक्षरनंदन प्राथमिक विद्यालय व SGP इंटरनॅशनल स्कूल, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी कातळे नगर येथील नंदादीप विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी केले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने होते. प्रमुख पाहुणे म्हणून नूतन जिल्हा परिषद सदस्या योगिता उमाकांत जाधव, माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा या वर्षीचे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. उमाकांत जाधव, गांधी चौक पोलीस स्टेशन वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्था सचिव कालिदास माने, अध्यक्ष भागवतराव माने, कोषाध्यक्ष सुरेखाताई माने, प्रकाश माने, प्रकाश जाधव, प्रशासकीय अधिकारी उषा आडे व नागोराव कांबळे मुख्याध्यापिका स्मिता भोसले उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थित पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर नूतन जिल्हा परिषद सदस्य योगिता उमाकांत जाधव, डॉक्टर उमाकांत जाधव, पोलीस उपनिरीक्षक बाबू गित्ते यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलाविष्कारांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रास्ताविक संस्था सचिव कालिदास माने यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका स्मिता भोसले यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे, मीनाक्षी यादव व शिवकांत मुर्गे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत उज्ज्वल यश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर व्दारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थी ठाकूर दत्ता दिगंबरसिंग (९५.०७ पर्सेंटाइल), दीक्षित वारद वसंत (८९.५१ पर्सेंटाइल), शिंदे वेदांत वसंत (८८.४६ पर्सेंटाइल) आणि जाजे वैष्णवी शिवकुमार (८१.४७ पर्सेंटाइल) यांनी जेईई मेन्स (पहिले सत्र) परीक्षेत घवघवीत गुण संपादित करून उज्ज्वल यश संपादन केले आहे.

हे सर्व विद्यार्थी सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आमच्या महाविद्यालयात घेण्यात आलेल्या नियमित तासिका, नियमित सराव परीक्षा आणि त्यातील अडचणी व उपाय योजना, संस्था पदाधिकारी, आई-वडील, प्रभारी प्राचार्य, मुख्य समन्वयक, पर्यवेक्षक, सीईटी सेल मुख्य समन्वयक, बोर्ड समन्वयक आणि विज्ञान शाखेचे सर्व शिक्षक यांच्या मार्गदर्शनामूळे हे उज्ज्वल यश प्राप्त झाले आहे अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

त्यांनी मिळविलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व सन्माननीय संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, सीईटी मुख्य समन्वयक प्रा. वनिता पाटील, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, स्टाफ सचिव, विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सव पार पडत आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अंतर्गतच यात्रा महोत्सवातील शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाचे उद्घाटन जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम व देवस्थानचे प्रशासकीय अधिकारी सचिन जांबूतकर यांच्या हस्ते करण्यात आले.



सिध्देश्वर यात्रा महोत्सवात विविध धार्मिक, सामाजिक व मनोरंजनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर शेतकजयांसाठी विविध उपक्रमही या यात्रेदरम्यान राबविण्यात येतात. जिल्हा कृषी विभागाच्या वतीने या यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून यात्रा परिसरात शेतकरी मदत व शेती माहिती कक्षाची उभारणा करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज मंगळवार दि. १७ रोजी करण्यात आले आहे. हा उद्घाटन सोहळा जिल्हा कृषी अधिक्षक आर. एस. कदम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी तालुका कृषी अधिकारी प्रमोद राठोड, उपाधिक्षक सूर्यकांत लोखंडे, देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, कृषी अधिकारी आर. आर. येवले, विशाल झांबरे, अजित देशमुख, विनायक बारबोले, महादेव घुले अमोल बनसोडे यांची उपस्थित होती.

या माहिती कक्षाच्या माध्यमातून आधुनिक शेती तसेच उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी राबविण्यात येणारे नवनविन प्रयोग याबाबत माहिती शेतकजयांना देण्यात येणार आहे. त्याचबरोबर कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी शेती कशी करावी याबाबतची माहिती अवगत करण्यात येणार आहे. सदर कक्ष सकाळी १० ते संध्याकाळी ६ या दरम्यान सुरु राहणार असून याठिकाणी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थित राहणार आहे. या कक्षाचा लाभ जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकजयांनी घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग व देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री केशवराज ज्युनिअर कॉलेजचे JEE MAINS-2026 परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या गएए चरळपी २०२६ या परीक्षेमध्ये भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री केशवराज ज्युनिअर कॉलेज, लातूर येथील विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. यामध्ये महाविद्यालयातील चि. कृष्णा शाम कच्छवे ९९.६०टक्के, चि. ईशान शशिकांत मोगरेकर ९६.३१ टक्के, चि. हर्षवर्धन लक्ष्मणराव लोमटे ९५.६४ टक्के, चि.प्रसाद गजानन चव्हाण ९२.८९ टक्के चि.श्रीनिधी योगेश ताशी ९२ टक्के, चि.आशिष बालाजी कुलकर्णी ८७.६७ टक्के, चि.रोहन विनायक गोसावी ८६.६३ टक्के, चि रमण नवनाथ गुरले ८६ टक्के, चि.सार्थक धनंजय कुलकर्णी ८५.९० टक्के, गुण मिळविले आहेत.



या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, जितेश चापसी, राम कुलकर्णी, संजय गुरव, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश कुलकर्णी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, कॉलेजचे प्राचार्य बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, विभाग प्रमुख रेखा पुरी तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार - २०२५ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १८ फेब्रुवारी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने वसळाी. ारहरीरिहीीर.र्सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार (राष्ट्रस्तरीय)**

रु.१ लाख रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार (मराठी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार (इंग्रजी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), बाबूराव विष्णू पराडकर पुरस्कार (हिंदी) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार(उर्दू) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), यशवंतराव चव्हाण पुरस्कार शासकीय गट (मराठी) (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पु.ल.देशपांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार(राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), केकी मूस उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार शासकीय गट (माहिती व जनसंपर्क) (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), समाज माध्यम पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), पत्रकार सुधाकर डोअीफोडे अग्रलेखन पुरस्कार (राज्यस्तर) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र).

**विभागीय पुरस्कार**

दादासाहेब पोतनीस पुरस्कार, (नाशिक विभाग)

५१ हजार रुपये , (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र,

या व्यतिरिक्त रुपये १० हजार दै.गावकरीने पुरस्कृत केले आहेत.), अनंतराव भालेराव पुरस्कार, (छत्रपती संभाजीनगर आणि लातूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), आचार्य अत्रे पुरस्कार, (मुंबई विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), नानासाहेब परूळेकर पुरस्कार, (पुणे विभाग) ५१ हजार रुपये, (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), शि.म.परांजपे पुरस्कार, (कोकण विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.गो.जाधव पुरस्कार, (कोल्हापूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), लोकनायक बापूजी अणे पुरस्कार, (अमरावती विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र), ग.त्र्यं.माडखोलकर पुरस्कार, (नागपूर विभाग) ५१ हजार रुपये (मानचिन्ह व प्रशस्तीपत्र)

## अग्रलेख...

# जागतिक नेतृत्वाची नवी संधी!

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आश्चर्यकारक क्रांती म्हणून नव्या शतकात उदयास आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता नावाच्या दुधारी हत्याराचे संपूर्ण उपयोग ध्यानात येण्याआधीच त्याच्या विनाशकारी बाजूच अगोदर उजेडात येऊ लागली. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विवेकाने झाला नाही, तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या रूपाने माणसाच्या मानगुटीवर बसलेला हा भस्मासुर आपल्या प्रगतीच्या सर्व वाटांनाच गिळंकृत करून भयाचे वातावरण निर्माण करेल, ही शंका खरी ठरू लागल्यानंतर आता त्याला लगाम घालण्याच्या जागतिक प्रयत्नांमध्ये भारताने घेतलेला पुढाकार लक्षणीय ठरतो. सोमवारपासून राजधानी दिल्लीत सुरू झालेल्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समीट २०२६' या पाच दिवसांच्या परिषदेत, याच तंत्रज्ञानाचे धोके आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे विविध पैलू यांचा व्यापक अभ्यास होणार आहे. एकूण ७०० सत्रांमध्ये या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पैलूंचा अभ्यास, उपयोग, उपद्रव आणि उपाय या सर्व बाबींवर सखोल विचारमंथन होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करताना घ्यावयाची सुरक्षिततेची काळजी, शासन-प्रशासनातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा सदुपयोगी वापर, देशाच्या दृष्टीने संवेदनशील समजल्या जाणाऱ्या क्षेत्रांत हे तंत्रज्ञान वापरण्याची भारतीय नीती आणि जागतिक परिक्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबतचा दृष्टिकोन अशा विविध मुद्यांचा या परिषदेत ऊहापोह होणार आहे. या परिषदेत या तंत्रज्ञानाच्या विवेकी वापराविषयीची जागतिक स्तरावरील मार्गदर्शक तत्त्वे निश्चित झाली, समस्यांवरील उपायांचा ऊहापोह झाला, तर या तंत्रज्ञानाच्या वापराबाबत भारत जगाचे नेतृत्व करेल आणि जागतिक मंचावर भारताच्या मानवी बुद्धिमत्तेचा पुरावाही सिद्ध होईल.

सामाजिक सुरक्षिततेस आव्हान देणाऱ्या वा समाजहितास घातक अशा कोणत्याही गोष्टीस लगाम घालावयाचा असेल, तर जनजागृती हा सर्वाधिक महत्त्वाचा उपाय असतो. वाढती गुन्हेगारी, फसवणूक, आर्थिक घोटाळे, भ्रष्टाचार आदी अनेक बाबी सामाजिक स्वास्थ्य बिघडविणाऱ्या असतात. त्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनात यंत्रणा सतत सजग असतातच; पण समाजाने किंवा नागरिकांनी जागरूक राहून अशा बाबींविरोधात सावधानता बाळगली, तर यापासून उद्भवणारे धोके टाळणे शक्य होते. डिजिटल व्यवहारांचे असंख्य फायदे देशात दिसू लागल्यानंतर डिजिटल फसवणुकीचे गैरप्रकार देशात वाढू लागले. अनेकांना अशा फसवणुकीचे फटके बसू लागल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्याची गंभीर दखल घेतली. गेल्या काही वर्षांत अशा गुन्हेगारीच्या माध्यमातून कष्टाने मिळविलेल्या कोट्यवधींच्या रकमेवर गुन्हेगारांनी डल्ला मारलाच; पण निष्पाप, निरपराध सामान्य नागरिकांस प्रचंड मनस्तापही भोगावा लागला आहे. एखाद्या गंभीर गुन्ह्यात हात असल्याचा आरोप करणाऱ्या दूरध्वनीमुळे कुटुंबाचे मानसिक स्वास्थ्य बिघडल्याच्या व मानसिक ताण असह्य झाल्यामुळे मृत्यू ओढवल्याच्या काही घटना याआधी घडल्या असल्याने 'डिजिटल अरेस्ट' नावाने फोफावलेली सायबर गुन्हेगारी असो किंवा डिजिटल संकेतांकांची चोरी करून पैशाची लुबाडणूक असो, असे प्रकार रोखण्याकरिता जनतेनेच जागरूक राहावयास हवे. 'थांबा, विचार करा आणि कृती करा' असा एक कानमंत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका संवादात्मक कार्यक्रमातून जनतेस दिला होता. पण या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराची पातळी एवढी खाली गेली आहे की, एवढ्या उपाययोजना माणसाच्या डिजिटल सुरक्षिततेची कडेकोट हमी देण्यास अपुऱ्या ठरू लागल्या आहेत. या तंत्रज्ञानाद्वारे होणारी फसवणूक म्हणजे सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेवरील घाला आहे, त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने अशा धोक्यांना आळा घालण्यासाठी भारतास आपली संपूर्ण प्रतिभा कशा प्रकारे पणाला लावावी लागणार आहे, सार्वजनिक डिजिटल सुविधांचा विस्तार करताना सुरक्षिततेची कोणती खबरदारी घ्यावी लागणार आहे आणि या तंत्रज्ञानाचा सर्वाधिक वापर होत असलेल्या स्वदेशी क्षेत्रांचा पाया जागतिक स्तरापर्यंत विस्तारण्यास कोणती मदत होणार आहे आदी बाबी स्पष्ट होतील. जगाच्या दृष्टीने या बाबी सार्वत्रिकदृष्ट्या मार्गदर्शक ठरणार असल्याने, या क्षेत्राच्या सुरक्षित आणि विवेकशील वापराच्या नैतिकतेची संहिता आखून देणारा भारत हा जगातील पहिला देश ठरणार आहे.

डिजिटल गुन्हेगारीचा वाढता सुळसुळाट पाहता, आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर हे भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. जसजसे कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान विकसित होत जाते, तसतसा त्याचा गैरफायदा घेण्याचे तंत्रज्ञान विकसित होत असते. त्यातूनच सायबर गुन्हेगारी वाढीस लागली असून कोट्यवधी रुपयांची लूट सुरू झाली आहे. या गुन्हेगारीस आळा घालण्याचे उपाय शोधणाऱ्या असंख्य परिषदा गेल्या काही वर्षांत झाल्या. या क्षेत्रातील तज्ज्ञांनी उपाय शोधण्यासाठी अहोरात्र संशोधने सुरू ठेवली आहेत. दहशतवादाहूनही अधिक भय फैलावणाऱ्या व असुरक्षिततेचे सावट माजविणाऱ्या या गुन्ह्याचे आव्हान अधिकाधिक गडद होऊ लागले असून सायबर गुन्हेगारी पूर्णपणे रोखणे सोपे नाही, याची जाणीव आता या यंत्रणांनाही झाली आहे. समाजमाध्यमांचा प्रचंड फैलाव झाल्यामुळे आभासी मंचाची उपलब्धता आता सर्वांसाठी सोपी झाली आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेल्या फसवणुकीच्या असंख्य प्रकरणांचा तपास गेल्या १० वर्षांहूनही अधिक काळापासून संपूर्ण यशाच्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेला नाही. या गुन्हेगारांचा नेमका ठावठिकाणा शोधणे हे एक आव्हान आहे. अनेकदा ही गुन्हेगारी देशाबाहेर असल्याने कायदेशीर कारवाईवरही मर्यादा येत असल्याचे सांगण्यात येते. या गुन्हेगारीची पाळेमुळे शोधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे विकसित तंत्रज्ञानाचे वरदान ठरेलच, पण त्याचा गैरवापर झाल्यास तो सर्वात धोकादायक शापही ठरेल, ही सुरुवातीची भीती वास्तविक असल्याच्या जाणिवा आता होऊ लागल्या आहेत. डीपफेक, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा वापर करून होणारे सायबर हल्ले नजीकच्या भविष्यकाळात तीव्र होणार आहेत, असा इशारा देणारा 'डाटा सिक्युरिटी कौन्सिल ऑफ इंडिया (डीएससीआय)'चा एक अहवाल अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करून घडणारे असे गुन्हे शोधणे अधिक अवघड होणार आहेच; या गुन्ह्यांचे जाळे पसरविणे मात्र सोपे होणार आहे, असा या अहवालाचा इशारा आहे. गेमिंग ॲप्स, अधिक परताव्याची प्रलोभने दाखवून ऑनलाईन गुंतवणुकीची आमिषे, ओटीपीच्या माध्यमातून होणारी लुबाडणूक अशा अनेक प्रकारांचा सुळसुळाट झाला आहे. केवळ डिजिटल अरेस्टसारख्या भयावह गुन्हेगारीतून आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पैसे कमावण्याच्या प्रलोभनांस बळी पडून नागरिकांची हजारो कोटींची कमाई सायबर गुन्हेगारांनी लुबाडली आहे. केवळ आर्थिक लुबाडणूक हेच या तंत्रज्ञानाच्या गैरवापराचा भस्मासुर रोखण्यापुढील आव्हान नाही, तर या माध्यमातून संवेदनशील माहितीची चोरी, सामाजिक शांततेस धोका निर्माण करणाऱ्या हालचाली रोखण्याचे आव्हानही यापुढे बिकट होत जाणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने बनावट ॲप्लिकेशन तयार करून लोकांस लुबाडण्याचे व फसविण्याचे प्रकार वाढीस लागण्याची भीती असल्याने, एकंदरीतच संपूर्ण व्यवस्थांची विश्वासार्हता पणाला लागणार आहे. सरकारी सेवांच्या नावाने समाजमाध्यमांवर बनावट व्यवस्था निर्माण करून त्यामध्ये गुंतवणूक करण्याची आमिषे दाखवून फसविण्याचे प्रकार वाढले, तर ते मोठेच संकट ठरेल. त्यामुळे ज्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा वापर करून गुन्हेगारीने उच्छाद मांडला, तेच तंत्र वापरून गुन्हेगारी मोडून काढण्याचे मार्ग या परिषदेत शोधले जातील आणि डिजिटल सुरक्षितता, सामाजिक आर्थिक संवेदनशीलता जपली जाऊन या तंत्रज्ञानाविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यास ही परिषद उपयुक्त ठरली, तर ते भारताचे मोठे यश ठरेल. सायबर गुन्हेगारांना वेसण घालून नागरिकांचे हक्क सुरक्षित राखण्यासाठी सरकारी स्तरावर प्रयत्न सुरू असले, तरी नागरिकांनी जागरूकता दाखविली तरच या युद्धास बळ मिळणार आहे. सायबर गुन्ह्यांचे सतत डोक्यावर दाटलेले मळभ दूर होण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरली, तर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भारताचे नेतृत्व जगाला मान्य करावे लागेल. यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने सुरू झालेली ही परिषद महत्त्वाची भूमिका बजावेल. जगभरातील ४५ हून अधिक देशांतील नेते, धोरणकर्ते, उद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील तज्ज्ञ याच नजरेने या परिषदेकडे पाहात आहेत.

## स्मरण

# अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे देखणे कुमार मामा

**डॉ. रिता विवेक सोनटक्के**

तुमचं असणं सर्व काही होतं. आयुष्यातील एक ते सुवर्ण पर्व होतं. आज सर्व काही असल्याची जाणीव आहे पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शशिकुमार शंकरराव भगत यांचे निधन झाले. मृत्यू हे एक शाश्वत सत्य असले तरी त्यांच्या मृत्यूमुळे आमच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली आहे. शशिकुमार भगत यांचा जन्म १८ डिसेंबर १९४४ साली मुक्तापूर येथे झाला. त्यांना तीन मोठ्या बहिणी व तीन मोठे भाऊ होते. ते घरात सर्वांत लहान असल्यामुळे सगळ्यांचे लाडके होते. दै. तरुण भारतमध्ये त्यांनी १९६८ ते २००४ पर्यंत जवळपास ३६ वर्षे काम केले व कार्यकारी संपादक म्हणून ते निवृत्त झालेत. चित्रपटसृष्टीवरील त्यांचे लिखाण अतिशय प्रसिद्ध होते. त्यांचे व्यक्तिमत्व अतिशय देखणे, मृदुभाषी व साधे होते.

भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. अप्रतिम, अत्यंत साधी व सोपी भाषा त्याला साहित्यिक वळण असे त्यांचे लिखाण होते. ते फक्त आमचेच मामा नव्हते तर बहुतांश लोक त्यांना कुमार मामा म्हणत असे. स्वच्छतेची अत्यंत आवड असणारे, देखणे कर्तबगार व सरस्वतीचा वरदहस्त असणारे आमचे मामा आज आपल्यात नाहीत, हे सत्य पचवणे जरा जडच जात आहे. त्यांनी ८० व्या दशकातील अनेक चित्रपट कलाकारांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यामुळे त्यांच्यासोबत प्रत्यक्ष भेटीचा सुवर्णयोग त्यांना मिळत असे. ते १९९१ साली पत्रकार संघाचे अध्यक्ष होते. बरेच वर्ष त्यांनी तरुण भारतच्या दिवाळी अंकाची मुख्य संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली. त्यातील एका अंकाला प्रथम क्रमांक मिळाला होता. अनेक



पुस्तकांसाठी प्रस्तावना लिहिल्या. त्यात डॉ. शेंबेकर यांच्या तसेच इकेबाना या लताताई व्यवहारे यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. दि. ३ जून २००३ रोजी जर्मनी, रशिया व स्वित्झर्लंड या तीन देशांचा दौरा आटोपून तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे विशेष विमान मायदेशी परत निघाले होते. या विमानात अटलजी यांच्या प्रतिनिधी मंडळासोबत जे सुमारे दोन डझन पत्रकार होते त्यात तरुण भारतचे शशिकुमार भगत हेसुद्धा होते. ते जवळपास आठ दिवस अटलजींसोबत होते. मला वाटतं की, ते त्यांच्या आयुष्यातील एक अपूर्व, चिरंतन टिकणारे व अविस्मरणीय क्षण असावेत. त्यांना अटलजींची मुलाखत घेण्याची संधी मिळाली व तसेच त्यांच्यासोबत घालविलेले देवदुर्लभ क्षण म्हणजे सुवर्ण पर्वणीच असावी. फक्त अटलजीच नव्हे तर दिवंगत प्रमोद महाजन हे जेव्हा भंडारा जिल्ह्यात दौऱ्यावर होते तेव्हा त्यांची सुद्धा मुलाखत मामांनी घेतली होती. १९८० मध्ये बंगलोर फिल्म फेस्टिव्हलमध्ये त्यांनी सत्यजित रे, यश चोप्रा व गुलजार यांची मुलाखत घेतली. संपादक असल्यामुळे विविध विषयांवर अप्रतिम असे लिखाण व सिनेसृष्टीतील दिग्गज लोकांच्या त्यांनी भेटी व मुलाखती घेतल्या. त्यात गुलाम अली, सचिन पिळगावकर, स्मिता पाटील, ओम शिवपुरी, नितीन मुकेश, राजीव कपूर, वैजयंती माला, सुरेश ओबेरॉय, हेमा मालिनी इत्यादी कलावंतांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत त्यांचे सुंदर फोटो पण आहेत.

मामांच्या मित्रपरिवारामध्ये नागपुरातील अनेक नामवंत डॉक्टरांचा समावेश होता. त्यात मेडिकलचे अधिष्ठाता स्व. डॉ. चौबे, स्व. डॉ. व्यवहारे, डॉ. बाभुळकर, डॉ. शेंबेकर, डॉ. कोलवाडकर आदींचा समावेश आहे. कुमार मामा आज आपल्यात नाही, पण त्यांचे लिखाण, त्यांच्या आठवणी आपल्यासोबत सदैव राहतील यात तिळमात्र शंका नाही. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी मीना मामी व मुलगी केतकी, जावई जयदीप, नातू व नात आहेत, ईश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो हीच प्रार्थना. ओम शांती शांती!

"Though you are not with us but your memories in the form of beautiful write up will be forever."

९४२२८२७५४७

## वेध

**विजय निचकवडे**

# 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार!

आज आम्हाला 'स्व'चा विसर पडला आहे. म्हणजे स्वतःचे कर्तव्य, जबाबदाऱ्या विसरत चाललो आहोत. म्हणूनच जे आपल्याशी सुसंगत नाही, त्याची 'संगत' वाढली अन् नीतिमूल्यांचा ऱ्हास झाल्यागत आपण वागू लागलो आहोत. दिवसागणिक नवनवीन पण मन सुन्न करणारे प्रकार पुढे येत आहेत. डॉक्टर आमच्यासाठी देवचं ना, पण तोच जिवाचा बाजार मांडत असेल आणि या बाजारात खरेदीदारांची गर्दी वाढून जिवांची बोली लागत असेल तर 'पांढऱ्या' कोटातील 'काळा' कारभार नैतिक अधःपतन नव्हे का? नीती, मूल्ये, समाजभान आणि सामाजिक दायित्व या गोष्टी गाठोड्यात बांधल्या गेल्या आहेत. मी, माझं आणि माझ्यासाठी एवढ्याच विश्वात स्वतःचं समाधान शोधणारी मानसिकता बोकाळत चालली आहे. हे सर्व करताना पैसा हा प्रत्येकाची कमजोर होऊन बसला आहे. पैसा मिळविण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची तयार अनेकांची असते अन् त्याचा प्रत्ययही अनेकदा येतो. मात्र, हे करताना आपण आपल्या 'स्व' ला गहाण ठेवतो, याचे भान कुणाला नाही. माझी जबाबदारी काय? मी ज्या पेशात आहे, त्याचे कर्तव्य कोणते? त्याकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टिकोन कसा आहे? हे आर्थिक स्वार्थापुढे विसरलो आणि नीतिमूल्यांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली.

खरं तर वैद्यकीय क्षेत्र म्हणजे पवित्र! डॉक्टर म्हणजे आम्हा प्रत्येकासाठी देवापेक्षा कमी नाही. कारण ते हात अनेकांचे जीव वाचवितात. मोठ्या विश्वासाने आम्ही आमच्या जिवापाड जपत असलेल्या लोकांना उपचारासाठी डॉक्टरांच्या सुपूर्द करतो. यामागे असतो, तो केवळ आणि केवळ डॉक्टरांवरील विश्वास! आज हा विश्वास किती ठेवावा, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या क्षेत्रातील काही महाभागांचे प्रताप वैद्यकीय क्षेत्रालाही नासवीत आहे. चार-दोन लोकांच्या कृतीने खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे आपले कर्तव्य वहन करणाऱ्या डॉक्टरांनाही खाली पाहण्याची वेळ येते, तेव्हा नैतिक अधःपतन झाल्याची जाणीव होते.

भंडारा जिल्ह्यात सध्या चांगलेच चर्चेत असलेले बाळ विक्री प्रकरण डॉक्टरांवरील विश्वास क्षणात संपविणारे आहे. उपचाराच्या नावाखाली रुग्णालयात ठेवीत असल्याचे सांगून चक्क लाखो रुपयात एका नवजात चिमुकलीचा 'सौदा' करून स्वतःच्या घरात आर्थिक संपन्नता आणण्याचा प्रयत्न करणारा डॉक्टर खरंच डॉक्टर म्हणविण्याचा योग्यतेचा आहे का? ज्या हातांनी जीव वाचवायचे, तेच हात जीव विकू लागले तर हा मांडलेला जिवाचा बाजार विकृत मानसिकतेचे दर्शन घडविणाराच आहे. जागतिक स्तरावर मुलांची विक्री हा अतिशय गंभीर आणि अमानवीय गुन्हा मानला जातो. पण हे जर सुशिक्षित मानवी मनाला समजत नसेल, तर हे बाजार भविष्यात व्यापक स्वरूपाचे होतील, हे तेवढेच खरे! कुणाच्या तरी परिस्थितीचा फायदा घेत स्वतःचा स्वार्थ साधायचा. हे करताना आपले कर्तव्य, आपल्या व्यवसायातील नैतिकता विकून टाकल्यागत वागायचे, याचे समर्थन होऊच शकत नाही? वैद्यकीय व्यवसायातील नीतिमत्ता पायदळी तुडविण्याचा हा प्रकार विविधांगांनी विचार करण्यास भाग पाडणारा आहे. अशावेळी डॉक्टरांचे दवाखाने म्हणजे बाळ विक्रीचा सुरक्षित अड्डा म्हणायचा का? हा प्रश्न पडतो. एक डॉक्टर असे करत असेल, तर ही नक्कीच त्याच्या वैद्यकीय व्यवसायाशी केलेली प्रतारणा आहे. पण मग अशा मानसिकतेला खतपाणी घालणाऱ्या समाजाचाही विचार व्हायला हवा! मुलांची विक्री हा प्रकार अवैध दत्तक विधान म्हणूनही पाहिला जातो. जे नियमानुसार नाही, ज्यासाठी 'त्या' जिवांची बोली लागते, ते चुकीचेच आहे. याची जाणीव असातानाही मुलांची खरेदी करण्याची चूक करण्याचे धाडस का होते, हा प्रश्नच आहे. डॉक्टरांनी जरी असा बाजार मांडला, तरी त्या बाजारात जाऊन व्यवहार करायचे की नाही, याचे तारतम्य या सौदबाजीत सहभागी होणाऱ्यांनी ठेवायला पाहिजे. आज मुलं न होणे ही समस्या वाढताना दिसते. याची अनेक कारणेही असतील. पण मग पैसे देऊन विकत घेतलेल्या मुलांमध्ये आपण खरा आनंद शोधू शकतो का? वस्तूंच्या बाजारातून एखादी गोष्ट विकत आणल्यानंतर त्याबद्दल किती आत्मियता आणि जिव्हाळा आम्हाला असतो, हे सर्वश्रुत आहे. तेवढ्यापुरते असलेले कौतूक नंतर आटू लागते. अशावेळी पैसे मोजून आणलेल्या बाळाप्रतीचा जिव्हाळा, प्रेम आटू लागल्यास अशा लेकरांची आयुष्यभराची होणारी हेळसांड मानवतेच्या सर्व सीमा पार करणारीच असेल! डॉक्टर म्हणून त्यांनी मांडलेला लेकरांचा बाजार नक्कीच त्यांच्या नैतिक अधःपतनाचे लक्षण आहे, पण माणूस म्हणून आपल्याला परमेश्वराने दिलेल्या वैचारिक क्षमतेचा वापर करून अशा बाजारांमध्ये आपण खरेदीसाठी जायचे की नाही, याचा विचार आपल्यालाच करायचा आहे. नाहीतर आज एक बाळ विकले गेले, उद्या हा आकडा वाढेल आणि आपण केवळ हे किती चुकीचे आहे, यावरच चर्चा करत राहू.

९७६३७१३४१७

## विशेष


# समुद्रानजीक औद्योगिकीकरण फायदेशीर

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताला साडेसात हजार किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून देशात सुमारे २१२ लहान आणि मोठी बंदरे आहेत. तथापि, पायाभूत सुविधांच्या कमतरता शेवटच्या मैलाची मर्यादित कनेक्टिव्हिटी आणि एकात्मिक नियोजनाच्या अभावामुळे अनेक दशकांपासून ही क्षमता वापरात आली नाही. किनारपट्टीच्या फायद्याचे धोरणात्मक आणि आर्थिक महत्त्व ओळखून भारत सरकारने 'सागरमाला' कार्यक्रम सुरू केला. सागरमाला कार्यक्रम किनारपट्टी विकासासाठी अतिशय महत्त्वाचा आहे. हा केवळ पायाभूत सुविधांचा प्रचार नाही, तर अभियांत्रिकी, अर्थशास्त्र, शाश्वतता आणि प्रशासन यांना एकत्र आणणारा परिवर्तनात्मक अजेंडा आहे. कार्यक्रमाचे यश केवळ भांडवली गुंतवणुकीवरच नाही, तर अनुभवजन्य डेटा आणि पर्यावरणीय जागरूकतेद्वारे मार्गदर्शन करणाऱ्या निर्णयांच्या गुणवत्तेवरदेखील अवलंबून आहे. येत्या काही वर्षांमध्ये भारताची बंदर क्षमता चार हजार दशलक्ष टन प्रति तासाहून अधिक होण्याचा अंदाज आहे. ही वाढ ग्रीनफील्ड डेव्हलपमेंट, मोठ्या नसलेल्या बंदरांवर क्षमता वाढ आणि विद्यमान बंदरांवर तांत्रिक सुधारणा यांच्या मिश्रणातून होईल. सागरमाला कार्यक्रमाचे वेगळेपण म्हणजे त्याचा एकात्मिक दृष्टिकोन. तो बंदरांकडे केवळ स्वतंत्र मालमत्ता म्हणून पाहत नाही, तर औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक्स पार्क, अंतर्देशीय जलमार्ग आणि सामाजिक विकास उपक्रमांसह मोठ्या परिसंस्थेचे आवश्यक घटक म्हणून पाहतो.

एकंदरीत, कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे भारतातील शाश्वत, समावेशक आणि कार्यक्षम बंदर परिसंस्थेचा मार्ग मोकळा होईल. बंदरे आणि शिपिंगची पुनर्कल्पना परिघीय पायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी केंद्रस्थानी म्हणून केली जात आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटरचा लांबीचा किनारा आणि जगातील काही सर्वांत व्यस्त बंदरे लाभली आहेत. बंदरे अस्तित्वात होती, परंतु बहुतेक उपयुक्तता म्हणून, धोरणात्मक वाढीचे इंजिन म्हणून नाही. त्याचा आता पुनर्विचार केला जात आहे. जागतिक व्यापारपद्धती बदलत असताना आणि लॉजिस्टिक्स खर्च स्पर्धात्मकतेला आकार देत असताना महाराष्ट्र विकासाच्या दृष्टिकोनाचे पुनर्संचयन करत आहे. बंदरे आणि जहाजबांधणी ही उपपायाभूत सुविधा म्हणून नव्हे, तर राज्याच्या आर्थिक विस्ताराच्या पुढील टप्प्यातील केंद्र म्हणून पुनर्कल्पित केली जात आहे. किनारपट्टी एक आर्थिक संसाधन आहे. सागरी मालमत्ता मूलभूत आहेत. उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या तीव्र इच्छेने लॉजिस्टिक्स कार्यक्षमता धोरणाच्या प्रकाशझोतात आणली आहे. आज बंदरे कार्गो हाताळण्या व्यतिरिक्तही बरेच काही करतात. कारखाने कुठे आणले जातात, पुरवठा साखळ्या कशा आयोजित केल्या जातात आणि कोणते प्रदेश गुंतवणूक आकर्षित करतात यावर त्यांचा प्रभाव पडतो.

महाराष्ट्राचे नूतनीकरण केलेले सागरी लक्ष्य 'सागरमाला'सारख्या राष्ट्रीय उपक्रमांशी सुसंगत आहे, परंतु त्यावर एक वेगळा राज्यस्तरीय भर आहे. बंदर नेतृत्वाखालील औद्योगिकीकरण हे त्याचे ध्येय आहे. बंदरांचा वापर करून किनाऱ्यावरील उत्पादनसमूह, लॉजिस्टिक्स इकोसिस्टिम आणि रोजगार निर्मितीसाठी एक आधार म्हणून काम करणे हेच त्याचे उद्दिष्ट आहे. या मांडणीत बंदरे ही अंतिम बिंदू नाहीत, तर राज्याच्या आर्थिक सुबत्तेचे प्रवेशद्वार आहेत. प्रस्तावित



वाढवण बंदर महाराष्ट्राच्या महत्त्वाकांक्षेचे प्रमाण दर्शवते. मुंबईच्या विद्यमान बंदरांवर गर्दी कमी करणे आणि पश्चिम किनाऱ्यावरील भारताच्या ट्रान्सशिपमेंट क्षमता मजबूत करणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. आधुनिक बंदरे वेळेचा कार्यक्षम वापर करू शकतात. मालवाहतुकीचा खर्च कमी करू शकतात आणि पुरवठा साखळीची विश्वासार्हता सुधारू शकतात. हे फायदे किनाऱ्यापासून दूर असलेल्या औद्योगिक पट्ट्यांमध्येदेखील होतात. महाराष्ट्राच्या बंदर धोरणातील एक परिसंस्था कार्गो हाताळणीच्या पलीकडे विस्तारलेली आहे. ती एक परिसंस्थाच असून त्यात लॉजिस्टिक्स पार्क, जहाजबांधणी आणि दुरुस्ती सुविधा, मत्स्यपालन पायाभूत सुविधा किनारी पर्यटन आदी घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक एकत्रितपणे 'नील अर्थव्यवस्थे'शी निगडित आहेत. समुद्र आणि किनाऱ्यांशी जोडलेल्या आर्थिक क्रियाकलापामध्ये व्यापार, उपजीविका आणि सेवांचा समावेश होतो. विशेषतः कोकणात बंदरांशी निगडित विकास दीर्घकाळापासून रखडलेली पायाभूत सुविधा गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीचे आश्वासन देतो.

हे धोरण प्रभावीपणे अंमलात आणले गेले, तर सागरी विकास राज्यातील प्रादेशिक विकासाचे संतुलन पुन्हा साधू शकतो. शहरी केंद्रांवरील दबाव कमी करून किनाऱ्यालगत नवीन विकास कॉरिडॉर उघडू शकतो. सागरी विस्तार क्वचितच व्यत्ययाशिवाय पुढे जातो. किनारी क्षेत्रे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील आहेत आणि बंदर प्रकल्प बहुतेकदा मासेमार समुदायांच्या उपजीविकेशी जोडलेले असतात. संपूर्ण भारतात अशा प्रकल्पांना भूसंपादन, पर्यावरणीय परिणाम आणि भरपाई चौकटींबाबत विरोधाचा सामना करावा लागला आहे. महाराष्ट्र सरकारने या घटकांची सुरक्षा आणि सल्लामसलत करण्यास वचनबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे, परंतु पूर्वानुभवानुसार या प्रक्रियांमध्ये सातत्य असायला हवे, असे वाटते. पर्यावरणीय मंजुरी आणि भागधारकांचा सहभाग हे केवळ नियामक अडथळे नाहीत, ते प्रकल्पाची व्यवहार्यता निश्चित करणारे घटक आहेत. खटले किंवा विरोधामुळे होणारा विलंब आर्थिक परतावा आणि सार्वजनिक विश्वास दोन्ही लक्षणीयरीत्या कमी करू शकतो. प्रशासनाच्या दृष्टिकोनातून येथेच महाराष्ट्राच्या सागरी धोरणाला सर्वांत कठीण परीक्षेचा सामना करावा लागतो. बंदर धोरण एका जटिल संस्थात्मक वळणावर आहे. राज्य विभाग, केंद्रीय संस्था, पर्यावरण नियामक आणि स्थानिक सरकारे प्रकल्प विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अधिकार वापरतात. यासाठी प्रशासकीय शिस्तीची गरज आहे. राजकीय नेते निर्णय घेण्यास गती देऊ शकतात, परंतु दीर्घकालीन यश अंमलबजावणी क्षमतेवर अवलंबून असते.

शिपिंगकडे अनेकदा कमी लक्ष दिले जाते. किनारी शिपिंग आणि अंतर्देशीय जलमार्ग रस्ते वाहतुकीपेक्षा किफायतशीर आणि कमी उत्सर्जन पर्याय देतात, तरीही त्यांचा वापर मर्यादित राहतो. कार्यपद्धतीतील सुधारणांशिवाय वाढीव बंदरक्षमतेचे फायदे अपूर्ण राहतील. २०२६ ते २०३५ दरम्यान महाराष्ट्राची सागरी रणनीती राज्याच्या आर्थिक भूगोलात बदल घडवून आणू शकते. कार्यक्षम बंदरे आणि एकात्मिक शिपिंग नेटवर्कमध्ये शहरांची गर्दी कमी करण्याची, लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्याची आणि नवी किनारी विकास केंद्रे तयार करण्याची क्षमता आहे. तथापि, हा पूर्वनिर्धारित निष्कर्ष नाही. महाराष्ट्राची नील अर्थव्यवस्था धोरण शाश्वत विकास प्रदान करते, की वादग्रस्त पायाभूत सुविधांसाठी एक महत्त्वाचा मुद्दा बनते, हे संतुलन किती प्रभावीपणे राखले जाते यावर अवलंबून असेल. बंदरांचे आधुनिकीकरण, किनारी आर्थिक क्षेत्रे तयार करणे आणि बंदर नेतृत्वविकासाच्या मजबूत चौकटीद्वारे लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, हा एक प्रमुख देशव्यापी उपक्रम आहे. हा कार्यक्रम अलिकडच्या वर्षांमध्ये हाती घेतलेल्या सर्वांत मोठ्या पायाभूत सुविधा परिवर्तनांपैकी एक आहे. सागरी क्षेत्र केवळ वस्तूंच्या वाहतुकीसाठी आवश्यक नाही, तर रोजगार निर्मिती, औद्योगिक विकास आणि राष्ट्रीय सुरक्षेतही महत्त्वाची भूमिका बजावते. 'सागरमाला'च्या माध्यमातून भारत भौतिक पायाभूत सुविधा वाढवत असून आर्थिक विकासासाठी उत्प्रेरक म्हणून बंदरांना स्थान देणाऱ्या सहायक धोरणात्मक सुधारणा विकसित करत आहे.

सागरमाला कार्यक्रम पाच धोरणात्मक स्तंभांवर बांधला गेला आहे. बंदर आधुनिकीकरण, बंदर कनेक्टिव्हिटी, बंदर-नेतृत्वाखालील औद्योगीकीकरण, किनारी समुदाय विकास आणि किनारी नौवहन आणि अंतर्गत जलवाहतूक. हा बहुआयामी दृष्टिकोन सुनिश्चित करतो, की पायाभूत सुविधांचा विस्तार आर्थिक नियोजन आणि सामाजिक विकासाशी संक्रमित केला जातो. वाहतूक नेटवर्कला औद्योगिक कॉरिडॉर आणि समुदाय उपक्रमांशी जोडून सागरमाला किनारी विकासाचे समग्र मॉडेल स्वीकारते. सध्या कार्यक्रमांतर्गत २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि इतर अनेक अंमलबजावणीच्या प्रगत टप्प्यात आहेत. प्रमुख बंदरांवर नवीन बर्थ सुरू करणे, किनारी नौवहनात वाढ आणि अंतर्गत जलमार्ग मालवाहतुकीत वाढ यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त क्रूझ पर्यटन आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेले प्रकल्प समावेशक वाढीच्या दृष्टिकोनात योगदान देत आहेत. भारताची बंदरे दर वर्षी अंदाजे १.३ अब्ज टन मालवाहतूक करतात आणि देशाच्या व्यापारापैकी सुमारे ९० टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. तथापि, मालवाहतूक अपुरी राहिली आहे, अनेक बंदरे गर्दीने भरलेली आहेत आणि काहींचा वापर कमी झाला आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### भारतीय संघ विजेतेपदाचा दावेदार

टी-२० विश्वचषक स्पर्धेत रविवारच्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. भारताने पाकिस्तानला चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत सामना जिंकला. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला. भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल आठ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरुवात करून भारताला पावणेदोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्तानला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका व नामिबियालाही असेच एकतर्फी नमविले होते. आता भारत सुपर ८ मध्ये पोहोचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे, असे म्हणावे लागेल. जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर आठमध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल; सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी-२० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही. एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्त्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते; पण सध्याचा फॉर्म पाहता भारत विजेतेपदाचा प्रबळ दावेदार वाटतो. भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर तीन वेळा टी-२० चा विश्वचषक जिंकणारा तसेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकणारा भारत पहिला संघ ठरू शकतो.

**श्याम ठाणेकर**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### सत्तातुराणां न भयं, न लज्जा

'टिपूला शिवरायांच्या समकक्ष मानायला हवे : हर्षवर्धन सपकाळ' ही बातमी वाचली (तरुण भारत, १५ फेब्रुवारी) आणि आजिबात आश्चर्य वाटले नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजतागायत काँग्रेसच्या नेत्यांनी अनेक नायकांना/राष्ट्रप्रेमी संघटनांना खलनायक ठरवून त्यांची यथेच्छ बदनामी केली आहे; अजूनही ते ती करत आहेत. त्याचबरोबरीने जवळपास सर्वच खलनायकांना नायक ठरवून त्यांचे उदात्तीकरणही केले आहे. काँग्रेसचे नेते मोठे अभ्यासू इतिहास संशोधक असते तर त्यांच्या वक्तव्याला कदाचित गांभीर्याने घेतले गेले असते आणि त्यावर चर्चाही झाल्या असत्या. तसे काहीही नसताना केवळ अल्पसंख्यक समाजाचे लांगूलचालन करून, त्यांची मतं सत्ता मिळविण्यासाठी केली जात आहेत, हे अधिक संतापजनक आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांची महती संपूर्ण जगाने मानली असताना त्यांची तुलना एका जुलमी सुलतानाशी करावी आणि तेही एका राष्ट्रीय पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलेल्या एका मराठी इसमाने, यासारखे दुर्दैव ते काय? सत्ताप्राप्तीसाठी काँग्रेस पक्ष कोणत्याही खालच्या पातळीवर जाऊ शकतो हे इतिहासात अनेकदा सिद्ध झाले आहे. समाजामध्ये धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा अनेक मुद्यांवर फूट पाडून सत्ता मिळवण्याची काँग्रेस पक्षाची 'मोडस ऑपरेंडी' आहे. सत्तेपुढे देशहित, राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता, सामाजिक आणि धार्मिक एकता, देशाची सुरक्षितता अशांसारख्या महत्त्वाच्या मुद्यांना काँग्रेसच्या लेखी काहीही किंमत नाही. म्हणूनच हर्षवर्धन सपकाळांच्या या आततायी आणि बेलगाम वक्तव्याचा कडाडून निषेध केला पाहिजे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जाणता राजा

ज्या काळात माणसामाणसात भेद केला जायचा, त्या वेळी सर्व जाती-धर्मातील प्रजा ही आपली लेकरं आहेत. अशी आपुलकीची वागणूक देणारे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरीवर झाला. बालपणी केलेले योग्य संस्कारच माणसाला घडवत असते. शिवाजी महाराज घडविण्याचा सर्वांत मोठं हात जिजामातेचं आहे.

राजा हा प्रजेचा पालनकर्ता असतो, उपभोगी नसतो. प्रजेने उभे केलेल्या साम्राज्याचा तो केवळ विश्वास म्हणून धनी असतो, हे तत्त्व त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले. स्वतःचे राज्य ही कल्पना त्यांना कधीच पटली नाही. राज्य हे प्रजेचे गोरगरिबांचे, साधुसंन्यासाचे आहे, या समजुतीनेच त्यांनी कारभार चालवला. महाराज कधीच जातिभेद करीत नव्हते, सर्वांना नियम सारखे होते. परस्त्रियांना आपली माता, बहीण मानत असत. १६७४ साली रायगड येथे त्यांचा भव्य राज्याभिषेक झाला आणि ते छत्रपती म्हणून गौरवले गेले. त्यांनी स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरवले आणि मराठी माणसाच्या मनात स्वाभिमान जागवला. जाणता राजा म्हणून ते लोकांच्या हृदयात अमर आहेत.

**प्रीती खोब्रागडे**/मालवण

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# कांद्याच्या पिकात लपवलेली अफूची शेती उघड; स्थानिक गुन्हे शाखेचा छापा

**तभा वृत्तसेवा**

बीड : शेतात कांद्याच्या पिकाच्या आडोशाने बेकायदेशीररित्या केलेली अफूची शेती स्थानिक गुन्हे शाखेने आज दुपारी केलेल्या एका मोठ्या कारवाईत उघडकीस आणली आहे. या छाप्यात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अफूची झाडे जप्त केली असून एका संशयित आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. या धडक कारवाईमुळे अंमली पदार्थ तस्करांचे धाबे दणाणले असून ग्रामीण भागात खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या अधिक माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेला एका गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली होती की, एका इसमाने आपल्या शेत गट क्रमांक १२७ मध्ये कांद्याच्या पिकात लपवून अफूची लागवड केली आहे. या माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी पथक तयार करून संबंधित शेतावर छापा टाकला. यावेळी तिथे कांद्याच्या पिकात सुमारे १० गुंठे जमिनीमध्ये अफूची बेकायदेशीर लागवड केल्याचे दिसून आले. कृषी अधिकाऱ्यांनी या पिकाची पाहणी करून ते अफूचेच असल्याचे अधिकृतपणे स्पष्ट केले आहे.

या कारवाईमध्ये पोलिसांनी सुमारे १३ किलो २६० ग्रॅम वजनाची अफूची झाडे जप्त केली आहेत. जप्त केलेल्या या मुद्देमालाची किंमत तीन लाख ३१ हजार ५०० रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी शेतमालक बन्सी महादेव घाडगे याच्याविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने फत्ते केली आहे. अंमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याविरुद्ध पोलिसांनी उघडलेल्या या मोहिमेचे सर्वत्र कौतुक होत असून, अशा अवैध व्यवहारांची माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वाढदिवस विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवुन साजरा



परळी वैजनाथ : मा खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने परळी शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवत उत्साहात साजरा करण्यात आला. परळी शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर, भारतीय जनता पार्टी उपाध्यक्ष महादेव इटके, राजेंद्र ओझा, उमेश खाडे, नितीन समशेट्टे आदींनी परिश्रम घेतले.

बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ प्रितमताई गोपीनाथराव मुंडे यांचा वाढदिवसाच्या निमित्ताने आज दि. 17 फेब्रुवारी सकाळी ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथास अभिषेक व महाआरती करत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रभू वैद्यनाथाच्या चरणी डॉ प्रितमताई यांच्या दीर्घायुष्य मिळावे अशी प्रार्थना करण्यात आली. यानंतर भीमनगर येथील सुगंधकुटी बुद्धविहार येथे बुद्धवंदना करण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयात भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तर्फे रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. बंगला गल्ली येथील हुसेन शहावली दर्गा येथे चादर चढवून डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या दीर्घायुष्य साठी प्रार्थना करण्यात आली.

ना. पंकजताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात केक कापून सर्व भाजपा पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्त्यांनी डॉ प्रितमताई मुंडे यांच्याशी व्हीडिओ कॉल करून शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. प्रितमताई यांना प्रत्येक कार्यकर्त्यांनी व्यक्तिगत शुभेच्छा दिल्या. भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी मनोगत व्यक्त करून डॉ प्रितमताई मुंडे यांना निरोगी आयष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर प्रभू वैद्यनाथ मंदिर जवळील अन्नपूर्णा मातेस महाआरती व भोजन करण्यात आले.

## काडीवडगावच्या शनिदेव व मारुती मंदिरात प्रति अमावस्या सोहळा उत्साहात



माजलगाव, दि. १८ प्रतिनिधी : शहरातील काडीवडगाव नंबर 2 मंजरथ रोड माजलगाव या भागात असलेल्या श्री शनिदेव व मारुती मंदिरात अमावस्या निमित्त दि. १७ मंगळवारी भजनाचा व महापंगतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी उपस्थित ह.भ.प. कल्याण नाना शेंडगे. सुरवसे बप्पा, सटवा आप्पा काळे, त्रिंबक महाराज फपाळ, शंकर तौर, शिवाजी घायतीडक, जंगले महाराज, अशोक मेंडके, सावंत महाराज, बाबासाहेब कर्डिले, भगवान गोपाळ, नागनाथ म.जोगडे, मृदुंगाचार्य विठ्ठल क्षीरसागर, विष्णू म. बादाडे व महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक विक्रम राऊत व अमावस्याचे अन्नदाते विश्वनाथ राऊत व विठ्ठल क्षिरसागर यांची उपस्थिती होती. शहरातील काडीवडगाव नंबर 2 मंजरथ रोड येथील श्री शनिदेव व मारुती मंदिरात दर महिन्याच्या अमावस्येला भक्तिभावाने धार्मिक सोहळा साजरा करण्यात येतो. अमावस्येनिमित्त पहाटेपासूनच मंदिर परिसरात भक्तांची गर्दी उसळली होती. श्री शनिदेव व मारुती रायांच्या मूर्तींचे अभिषेक, पूजन व आरती करून कार्यक्रमाची सुरुवात होते भक्तांकडून तेल अर्पण, नारळ फोडणे, फुलमाळा अर्पण तसेच नवसपूर्तीचे विधी पार पाडले जातात. मंदिरात दिवसभर हरिनाम संकीर्तन, भजन आणि कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. काडीवडगाव नंबर 2 ग्रामस्थांच्या सहकार्याने हा सोहळा उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडतो. अमावस्येच्या निमित्ताने मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण होऊन भाविकांना आध्यात्मिक समाधान लाभते.

## 80 हजारांची पर्स सापडताच पोलिसांकडे जमा, पोलिसांनी केले कौतूक



अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरात प्रामाणिकपणाचे दर्शन घडवणारी घटना समोर आली असून, क्रांतीनगर येथील गॅरेज चालक खलील रफिक शेख यांनी एका महिलेची हरवलेली पर्स प्रामाणिकपणे पोलिसांकडे जमा करून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. दिनांक 17 फेब्रुवारी रोजी दुपारी चनई परिसरात खलील शेख यांना 80 हजार रुपये रोख, सोन्याचे दागिने आणि मोबाईल असलेली पर्स आढळून आली. ही पर्स डोंगर पिंपळा येथील राधा पवार या महिला आपल्या मुलांना लघुशंकेसाठी थांबल्या असताना विसरून गेल्या होत्या. पर्स सापडल्यानंतर खलील शेख यांनी कोणतीही लालूच न ठेवता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधत पर्स अंबाजोगाई पोलीस ठाण्यात जमा केली. पोलिसांनी पर्सच्या मालकिणीची खातरजमा करून सर्व रोकड व मौल्यवान ऐवज राधा पवार यांच्याकडे सुरक्षितपणे परत केला. या प्रामाणिक कृतीबद्दल अंबाजोगाई पोलिसांनी खलील शेख यांचा विशेष सत्कार केला असून त्यांच्या या आदर्श वागणुकीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने

### आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर रविवारी व्याख्यान



**तभा वृत्तसेवा**

अंबाजोगाई : रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) यांचे आनंदी आयुष्याचा मंत्र या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाई व इनरव्हील क्लब अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा, मैत्री आणि सामाजिक बांधिलकीचा ध्यास जोपासत आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणादायी उपक्रम म्हणजे आनंदी आयुष्याचा मंत्र एक विशेष व्याख्यानमाला आयोजित केली आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात ताण, स्पर्धा आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली आपण अनेकदा आनंद हरवून बसतो. आनंदी, सकारात्मक आणि समाधानी जीवन कसे जगावे ?, मानसिक स्वास्थ्य, नातेसंबंध आणि आत्मविश्वास कसा वाढवावा या सर्व प्रश्नांची उत्तरे देणारे प्रेरणादायी व्याख्यान रविवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई या ठिकाणी आयोजित करण्यात आले असून यावेळी प्रमुख वक्ते बी.के.राजसिंह (माऊंट अबू, राजस्थान) हे आपले मौलिक विचार व्यक्त करून अनमोल मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानातून आपण आनंदी राहण्याचे वैज्ञानिक व व्यावहारिक मार्ग, सकारात्मक विचारांची ताकद, ताण-तणावावर प्रभावी उपाय, यशस्वी व समाधानी जीवनाची गुरूकिल्ली हे जाणून घेणार आहोत. तरी अंबाजोगाई शहर व परिसरातील आपण सर्वांनी उपस्थित राहून या ज्ञानमय व प्रेरणादायी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती रोटरी क्लब ऑफ मनोहर अंबाजोगाईचे रो.भिमाशंकर शिंदे (अध्यक्ष), रो.सुनील व्यवहारे (सचिव) आणि रो.पुरूषोत्तम रादंड (प्रोजेक्ट डायरेक्टर) यांनी केले आहे.

## नुकसान भरपाई संदर्भात तात्काळ नवीन कायदा करून अंमलबजावणी करा : वसंत मुंडे

**तभा वृत्तसेवा**



परळी (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्यातील त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्यासाठी शेतीमाला संदर्भात किमान आधारभूत किंमत, पिक विमा व बोगस खते बी बियाणे कीटकनाशके औषधे संदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची कायद्यात तरतूद करून तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असल्या तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी करणारे लोकप्रतिनिधी संबंधित खात्याचे कर्मचारी व अधिकारी, मंत्री कार्यालयात टक्केवारी घेतल्या शिवाय कामांना मंजुरी मिळत नाही. असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे नी केला . पशुसंवर्धन व कृषी प्रदर्शन मेळावे राज्यात विविध ठिकाणी चालू आहेत परंतु जनतेच्या टॅक्स मधून जो पैसा शासनाला मिळतो त्याचा दुरुपयोग प्रदर्शने, मेळावे व बोगस योजना दाखवून संबंधित प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी मंत्री कार्यालयात टक्केवारी घेऊन पैसे हडप करतात त्यातून जनतेच्या हिताच्या योजनाची अंमलबजावणी नियमानुसार होत नाही. शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान, नवीन खते, बी बियाणे, औषधी कीटकनाशके, आधुनिक शेती अवजारे, शेतीशी निगडीत नवीन प्रयोग व पशुसंवर्धना संदर्भात नवीन सरकारच्या योजनाची माहिती जनतेपर्यंत प्रसार माध्यमाद्वारे व विविध विभागामार्फत प्रत्यक्षात दिली पाहिजे. परंतु जनतेचे पैसे खर्च करण्याकरता हे मेळाव्याचे आयोजन केले जाते असा गंभीर आरोप काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

## उद्योग कौशल्यवर्धन आणि अमृत आरीवर्क प्रशिक्षणवर्ग उद्‍घाटन; दोन्ही वर्गांना लाभार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

बीड : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी विविध प्रकारचे निःशुल्क, पण दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. त्यापैकी अमृत उद्योग कौशल्यवर्धन प्रशिक्षण ( ईडिपी ) आणि अमृत आरीवर्क प्रशिक्षण या दोन प्रशिक्षणवर्गांचा प्रारंभ बीड शहरात झाला आहे. सहयोगनगरातील श्री गुरुनानक दरबार येथे उद्घाटन कार्यक्रम उत्साहात पार पडला.





बीडमध्ये अमृत संस्थेतर्फे पहिल्यांदाच हे दोन्ही प्रशिक्षण वर्ग स्वतंत्र स्वरूपात सुरू करण्यात आले असून, प्रत्येकी २० लाभार्थ्यांच्या दोन बॅचेस सुरू झाल्या आहेत.

उद्घाटन कार्यक्रमाला अमृत संस्थेचे विभागीय व्यवस्थापक ओंकार शेटे, समर्थ नर्सिंग स्कूलचे संचालक व उद्योजक डॉ. प्रशांत देशपांडे, दीनदयाळ शोध संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख, अमृत संस्थेचे नांदेड जिल्हा व्यवस्थापक सौरभ कुलकर्णी, दीनदयाळ शोध संस्थानच्या सौ. सीमा मनूरकर, तसेच अमृत संस्थेचे बीड जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी व जिल्हा उपव्यवस्थापक दिगंबर जोशी उपस्थित होते.

उद्घाटनावेळी ओंकार शेटे यांनी अमृत संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन संस्था खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी संस्था कौशल्य प्रशिक्षण, व्याजपरतावा योजनेसह विविध रोजगाराभिमुख योजना राबवत असल्याचे सांगितले. लाभार्थ्यांनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष व्यवसाय सुरू करावा, असे सांगून व्यवसायाच्या प्रत्येक टप्प्यावर अमृत संस्था सोबत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## दुसऱ्याचा विचार म्हणजे अंत्योदय - प्रकाश पाठक

### सावरकर महाविद्यालयात ' एकात्म मानवदर्शन' संगोष्टी

**तभा वृत्तसेवा**

बीड (प्रतिनिधी) समाजातील सामान्य माणसाला उभे करणे, आपल्या प्रगतीत दुसऱ्यांचा विचार म्हणजे अंत्योदय आहे असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'एकात्म मानवदर्शन' संगोष्टीच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक डॉ.उपेंद्र कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, सांगोष्टीचे निमंत्रक डॉ.हंसराज



जोशी, आयोजन सचिव डॉ.अनंत देशपांडे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना बिजभाषक प्रकाश पाठक म्हणाले की दीनदयालजींनी मानवी कल्याणाचा विचार मांडला. शरीर, मन, बुद्धी आत्मा यांचा एकत्रित विचार त्यांनी मांडला. निसर्गाचा ऱ्हास करून प्रगतीची संकल्पना मांडणे चुकीचे आहे. साम्यवाद आणि भांडवलशाही मानवी कल्याण करू शकत नाहीत. जगाच्या कल्याणासाठी आपल्या समृद्ध परंपरेतून आलेला एकात्म मानवदर्शन हाच विचार सर्वांना पुढे नेणार आहे असे भारतीय विचारांचे चिंतन दीनदयाळ उपाध्याय यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले शाश्वत विकास साधायचा असेल तर एकात्म मानवदर्शन हाच एकमेव उत्तम पर्याय आहे. याचा स्वीकार सर्वांनी करावा. विश्वाच्या कल्याणाचे हे तत्त्वज्ञान आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी केले. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रूपाली कुलकर्णी यांनी केले.

## वैद्यनाथ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची कराटे स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



**तभा वृत्तसेवा**

परळी प्रतिनिधी : परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. बी.एस्सी. तृतीय वर्षाच्या कु. अमृता मनोहर काळे व कु. वैष्णवी वैजनाथ जिगे यांनी 26 वी ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिप 2026 या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले.

ही स्पर्धा एशियन शितो रिव्ह स्पोर्ट्स कराटे डू असोसिएशन व मुंबई स्पोर्ट्स कराटे असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पवई, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या सामन्यांमध्ये उत्कृष्ट कौशल्य, चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर दोन्ही विद्यार्थिनींनी रौप्य पदकावर आपले नाव कोरले.

## परळीतील युनिक क्युरियस किड्स मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

परळी वैजनाथ (प्रतिनिधी ) :- शहरातील युनिक क्युरियस किड्स या प्री-प्रायमरी शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी संपूर्ण शाळा शिवमय वातावरणात न्हाऊन निघाली होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांच्या पारंपरिक वेशभूषेने सजलेल्या भव्य रॅलीने झाली. सर्व विद्यार्थ्यांनी शिवकालीन पोशाख परिधान करून शाळेच्या परिसरात जयंती रॅली काढली. "जय भवानी, जय शिवाजी"च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.



चिमुकल्या विद्यार्थिनींनी लाठी-काठीचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांनी शिवरायांचा जयघोष आणि मुजरा सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत वातावरण अधिक जोशपूर्ण केले.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या संचालिका सौ. पूजा सारडा मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांचे शौर्य, स्वाभिमान आणि देशप्रेम या गुणांचे महत्त्व सांगितले. हा प्रेरणादायी कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना जागवणारा ठरला.

## किल्ले धारूरमध्ये शिवजयंतीचा स्तुत्य उपक्रम: १०३ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी!

### डॉ. मयूर सावंत आणि सहकाऱ्यांकडून सामाजिक बांधिलकीचे दर्शन; औषध वाटपही मोफत

**तभा वृत्तसेवा**

किल्ले धारूर (प्रतिनिधी): रयतेचे राज्य निर्माण करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून, किल्ले धारूर येथे सामाजिक बांधिलकीचा एक आदर्श पायंडा पाडण्यात आला. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या ३७ व्या वर्षानिमित्त भव्य मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १०३ गरजू रुग्णांची सखोल तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.

लोकसेवेतूनच खरी 'शिवसेवा'

रणविजय हॉस्पिटलच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या उपक्रमात नगरसेवक डॉ. मयूर सावंत, तज्ज्ञ डॉक्टर डॉ. भाग्यश्री सावंत आणि डॉ. ऐश्वर्या सावंत यांनी रुग्णांची काळजीपूर्वक तपासणी केली. शिवरायांच्या प्रेरणेतून जनतेची सेवा करणे हीच खरी 'शिवसेवा' आहे, अशी भावना आयोजकांनी यावेळी व्यक्त केली.

महिला व ज्येष्ठांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



ग्रामीण भागातील नागरिकांनी, विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि मोफत औषधोपचार मिळाल्यामुळे रुग्णांनी समाधान व्यक्त केले.

> "डॉ. मयूर सावंत हे आपल्या वडिलांचा, माजी नगराध्यक्ष स्वर्गीय मुकुंदरावजी सावंत यांचा लोकसेवेचा वारसा समर्थपणे पुढे चालवत आहेत," अशा शब्दांत पंचक्रोशीतील नागरिकांनी त्यांचे कौतुक केले.

मान्यवरांकडून सत्कार

या यशस्वी आयोजनाबद्दल शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. मयूर सावंत व त्यांच्या टीमचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. "समाजाला अशाच आरोग्यदायी उपक्रमांची गरज असून, भविष्यातही असे कार्य सुरू राहावे," अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

आरोग्य सेवा आणि समाजसेवा यांचा हा सुंदर संगम किल्ले धारूरकरांसाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.

## बीड - पालकमंत्री सुनेत्रा पवारांच्या हस्ते कृषी प्रदर्शनाचे होणार उद्‍घाटन

**तभा वृत्तसेवा**

बीड : नवे तंत्रज्ञान, नवे विचार आणि समृद्ध शेतीकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित होऊन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेले मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन (वर्ष- ३ रे) याचा भव्य उद्घाटन समारंभ दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथे पार पडणार आहे. शेतकरी, कृषी तज्ञ, विद्यार्थी व नागरिकांसाठी हे प्रदर्शन मार्गदर्शक ठरणार असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, पीकपद्धतीतील बदल, सेंद्रिय शेती, पशुसंवर्धन व कृषी प्रक्रिया उद्योग याबाबत सविस्तर मार्गदर्शन या प्रदर्शनात दिले जाणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ना. दत्तात्रय भरणे (कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य), ना. पंकजा मुंडे (मंत्री पशुसंवर्धन, पर्यावरण व हवामान बदल, महाराष्ट्र राज्य), आ.धनंजय मुंडे (माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य), आ.प्रकाश सोळंके (माजी राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) आदी उपस्थित राहणार आहेत.

# शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित नृत्य, वेशभूषा, अभिनय स्पर्धांना उदंड प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित नृत्य स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, अभिनय स्पर्धा या विविध स्पर्धांच्या आयोजन दि.१७ फेब्रुवारी मंगळवार रोजी करण्यात आले होते त्यास उदंड प्रतिसाद मिळाला.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरामध्ये सार्वजनिक शिवजयंती महोत्सव महिला समितीच्या वतीने दि ११ फेब्रुवारी पासून सुरू आहे. त्यामध्ये विविध स्पर्धा होत आहेत दिनांक १७ फेब्रुवारी मंगळवार रोजी बालगट व खुल्या गटासाठी नृत्य स्पर्धा वेशभूषा आणि अभिनय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन कल्पनाताई भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या हस्ते झाले प्रमुख पाहुणे म्हणून लीना ताई दिलीप चव्हाण ह्या होत्या तर अध्यक्षस्थानी महोत्सव समिती अध्यक्षा सुनीताताई मुळे ह्या होत्या.तर प्रमुख उपस्थितीमध्ये शिवजयंती महोत्सव समितीच्या उपाध्यक्ष विद्याताई पवार, अर्चना जाधव, सचिव रजनी पाटील यांच्यासह कांताबाई कल्याणकर, अनिता सूर्यतळ, अरुणा आंभोरे, साधना हेंबाडे, सीमा वडकर, स्वातीताई भोयर, विद्या पतंगे, उषा इंगोले आदींची उपस्थिती होती. स्पर्धेचे प्रायोजक परी कलेक्शनच्या उशा किरण गायकवाड तसेच सोनकळी ज्वेलर्सच्या तेजस्विनी टाकळगावकर, डॉ.माधुरी देशमुख ह्या होत्या.

या स्पर्धे अंतर्गत सुरुवातीला वेशभूषा तसेच अभिनय स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये बालगट व खुल्या गटातील स्पर्धकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला त्यानंतर वैयक्तिक नृत्य व समूह नृत्य स्पर्धा झाल्या या स्पर्धांनाही उदंड प्रतिसाद मिळाला हिंगोली शहरातील शाळांसह जिल्हाभरातून विविध ठिकाणचे स्पर्धक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सायंकाळी उशिरापर्यंत ह्या स्पर्धा सुरू होत्या. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रणिता कौलवार, रक्षा बगडीया, माधुरी बोरबळे, सोनु भालेराव यांनी जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन सुजाता जोजारे व शिल्पा भालेराव यांनी केले तर आभार विद्या पवार यांनी मानले.स्पर्धा यशस्वीतेसाठी सागर चौधरी, मंजू बगडिया जयंती महोत्सव समितीच्या महिलांनी परिश्रम घेतले. स्पर्धेतील विजत्यांना दिनांक १९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण केले जाणार आहे तेव्हा सर्व स्पर्धकांनी या बक्षिस वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिवजयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विजेत्यांना आज पारितोषिकांचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

येथील सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन समितीच्या अध्यक्षा सुनीताताई मुळे, समिती मार्गदर्शक खंडेराव सरनाईक,त्र्यंबक लोंढे, ॲड. उल्हास पाटील नगरसेविका वैशाली गोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात दिं १८ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळच्या सत्रात वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जयंती मंडळाच्या सचिव रजनी पाटील,उपाध्यक्षा विद्या पवार, अर्चना जाधव, कांताबाई कल्याणकर, अनिता सूर्यतळ, गायत्री मुळे, स्वाती भोयर,मनीष आखरे, ऐड.अमोल जाधव. डॉ. रमेश शिंदे अमोल,सोनू डांगे, हरिभाऊ मुटकुळे, प्रकाश इंगोले आदींसह शिवजयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांसाठी शिवाजी महाराज आमचे प्रेरणास्थान छत्रपती तर महाविद्यालयीन गटासाठी राष्ट्रविकासासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची आवश्यकता या विषयावर स्पर्धा घेण्यात आली. दोन्ही गटासाठी प्रत्येकी प्रथम पारितोषीक २ हजार रुपये व शिवचरित्र, द्वितीय १ हजार ५०० रुपये व शिवचरित्र, तृतीय १ हजार रुपये व शिवचरित्र, प्रोत्साहनपर ५०० रुपये व शिवचरित्र असे पारितोषीक देण्यात येणार आहे. पारितोषीक गायत्री परसराम मुळे यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. दोन्ही गटातुन जवळपास १५० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता सायंकाळी उशिरापर्यंत स्पर्धा सुरू होत्या विजय त्यांना शिवजयंतीच्या दिवशी दि.१९ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता पारितोषिक वितरण केले जाणार आहे. स्पर्धा परीक्षक म्हणून नागनाथ सोळंके, प्रा.डॉ. बसवराज लक्षटे, डॉ. शोभा दुघाटे, गोडाती काळे, अलोक बासरकर, मंजुषा चेंडके आदींनी काम पाहिले.

# ‘भारत विस्तार’ डिजीटल प्रणालीचे ऑनलाईन लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली आणि कृषी विज्ञान केंद्र, तोंडापूर येथे ‘भारत विस्तार’ या महत्त्वाकांक्षी डिजिटल ॲपच्या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन झाले.

जयपूर (राजस्थान) येथून आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते ‘भारत विस्तार’ ॲपचे लोकार्पण करण्यात आले.

या ॲपच्या माध्यमातून देशातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, विविध शासकीय योजना, हवामान अंदाज, पीक संरक्षण, मृदा व्यवस्थापन तसेच बाजारभाव यांसारखी अद्ययावत माहिती एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केव्हीकेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली वेबकास्टिंगचे नियोजन करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शेळके यांनी भारत विस्तार ॲपमुळे दुर्गम भागातील शेतकऱ्यांना थेट शास्त्रज्ञांकडून तांत्रिक मार्गदर्शन सुलभ होणार असून, ही कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांती ठरेल. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी उपस्थित शेतकरी, कृषी पदवीधर तसेच महिला बचत गटांच्या सदस्यांनी थेट प्रक्षेपणाद्वारे ॲपच्या कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विषय विशेषज्ञ राजेश भालेराव (कृषी विद्या), अनिल ओळंबे (उद्यानविद्या), अजयकुमार सुगावे (पीक संरक्षण), रोहिणी शिंदे (गृह विज्ञान), डॉ. अतुल मुराई (कृषी विस्तार), साईनाथ खरात (मृदा विज्ञान), डॉ. कैलास गीते (पशु विज्ञान) तसेच विजय ठाकरे यांनी परिश्रम घेतले. तसेच मनीषा मुंगल, ओम प्रकाश गुडेवार, गुलाबराव सूर्यवंशी, मारोती कदम, संतोष हानवते व प्रेमदास जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



**हिंगोली– पुसेगाव येथे श्री १००८ मज्जिनेन्द्र आदिनाथ जिनबिंब पंच कल्याणक प्रतिष्ठा आंतरराष्ट्रीय महोत्सवानिमित्त बुधवारी मान्यवरांच्याहस्ते गर्भ कल्याणक कार्यक्रमात सहभागी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्यासह मुनी तसेच भाविक दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### रेसन्स इंग्लीश स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन



हिंगोली– रेसन्स इंग्लिश स्कूल चंदन नगर शिरड शहापूर येथे सतत तिसऱ्या वर्षी १८ फेब्रुवारी बुधवार रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे सीईओ विवेक गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, हिंगोली जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुधीर ठोंबरे, गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, ग्रामविकास अधिकारी कैलास देशमुख, सरपंच जितु रावले, उपसरपंच पुष्पा शिवाहार स्वामी, मेघा फडणीस, मेंटॉर अश्विनी यंबल आणि जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष आणि शाळेचे अध्यक्ष मिलिंद यंबल उपस्थित होते. हे विज्ञान प्रदर्शन स्वर्गीय राजकुमार नागोबा यंबल यांच्या स्मृतिदिनी भरवण्यात येते. गट अ वर्ग आठवी ते दहावी प्रथम पारितोषिक ओएसिस इंग्लिश स्कूल परभणी (५००० व चषक), गोरखनाथ विद्यालय चोंडी स्टेशन (३००० रू.व चषक), लालबहादूर शास्त्री विद्यालय वसमत (२००० व चषक)गट ब वर्ग ५वी ते ७वी प्रथम पारितोषिक ओयासिस इंग्लिश स्कूल परभणी( ३००० व चषक), द्वितीय पारितोषिक जे पी पी एस आडगाव (२००० रू व चषक), तृतीय पारितोषिक झेडपी स्कुल आंबा आणि ओएसिस इंग्लिश स्कूल परभणी (१०००रू व चषक) विभागून देण्यात आले. सीईओ कडून दिल्या जाणारे एक हजार रुपयांचे विशेष पारितोषिक दुर्गेश मंगेश पांडे बी आय एस हिंगोली यांना देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेमधील सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

### व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन



हिंगोली– सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व जिल्हा हॉलीबॉल असोसिएशनच्यावतीने हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन दि.१७ फेब्रुवारी मंगळवार रोजी सायंकाळी करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष सुनीताताई मुळे व हॉलीबॉल असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष तथा शिवसेना उबाठा जिल्हाप्रमुख अभय सावंत उर्फ गोपू पाटील, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जितेंद्र भट्ट, नगरसेवक उमेश नागरे आदींची उपस्थिती होती.

# शिवजयंतीनिमित्त आरोग्य शिबीर, कराओके शिव गीतांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

शिवप्रतिष्ठान शिवजयंती निमित्त गांधी चौक येथे दिनांक १९ शिवजयंती निमित्त दुपारी एक वाजता भव्य आरोग्य शिबिर तसेच तीन ते सात वाजेपर्यंत कराओके शिव गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे सदर आरोग्य शिबिराचा लाभ शहरातील नागरिकांनी घ्यावा असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

शिबिरात नामांकित डॉक्टर्स सेवा देणार आहेत तसेच आरोग्य विभाग यांचे मार्फत मोफत औषधी वाटप सुद्धा करण्यात येणार आहे यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड आरोग्य कर्मचारी अशा स्वयंसेविका परिश्रम घेत आहेत. त्यामध्ये सांधेदुखी,रक्तदाब, रक्त शरकरा कॅन्सर पोटाचे विकार छातीचे विकार त्वचा विकार व इतर विविध आजारांवर प्राथमिक तपासणी व औषधोपचार मोफत करण्यात येणार आहेत या शिबिरासाठी नामांकित डॉक्टर निमंत्रित केले आहेत ज्यांना या शिबिरात सेवा द्यायची आहे. त्यांनी शिबिरस्थळी येण्याचे आवाहन समितीतर्फे करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यानंतर लगेच चार ते सात वाजेपर्यंत हिंगोली येथील येथील स्थानिक गायन कलाकार शिव गीतांवर पोवाडे कराओके गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी जोरदार तयारी करण्यात आली आहे व कलाकार मेहनत घेत आहेत या कार्यक्रमास उपस्थित राहून या अगोदर कधी न ऐकलेली शिव गीते ऐकण्याची संधी तसेच पोवाडे गायनासाठी शाहिरी जलसा तयार आहे. या ब कार्यक्रमाचा आस्वाद घेण्याचे आवाहन हिंगोली कर नागरिकांना करण्यात येत आहे. या कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. संयोजक म्हणून रत्नाकर महाजन, संजय खिल्लारे गजानन उदावंत आदी परिश्रम घेत आहेत.

# हिंगोलीत शिवशंभो प्रतिष्ठानची स्थापना शिवशंभो गौरव पुरस्काराची घोषणा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**



जिल्हात सामाजिक एकता व समता जोपासण्यासाठी शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने आज दि.१९ फेब्रुवारी रोजी बुधवारी शिवशंभो प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली येणार आहे. प्रतिष्ठानच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना शिवशंभो पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

नुकतीच शिवशंभो गौरव पुरस्कार निवड समिती प्रमुख प्राचार्य पवन सोळंके, साहित्यिक अशोक अर्धापूरकर, नामदेव वाबळे, ॲड शेषराव पतंगे, ॲड. साहेबराव शिरसाट, पत्रकार राजेश दारव्हेकर, मिराताई कदम यांचा समावेश असलेल्या समितीने विविध क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान असणाऱ्याची समितीने शिवशंभो गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. ती पुढील प्रमाणे शिवशंभो विशेष गौरव पुरस्कार कृषि क्षेत्र सुरेशसिंग चंदनसिंग ठाकूर दांडेगाव ता. कळमनुरी, साहित्य क्षेत्र कलानंद जाधव हिंगोली,सामाजीक क्षेत्र महेश गणपतराव खुळखुळे औंढा नागनाथ,क्रिडा क्षेत्र सनी विठ्ठलराव पंडित हिंगोली,शिक्षण क्षेत्र गजानन नामदेव पायघन सेनगाव, उद्योग क्षेत्र रमेश संभाजी पंडित हिंगोली यांना जाहीर झाल्याची घोषणा पुरस्कार निवड समितीने केली आहे यावेळी शिवशंभो प्रतिष्ठानचे कल्याण देशमुख, गजानन मगर, उमेश नागरे, ॲड. रावन धाबे, ज्योती धुळे, ज्ञानेश्वर चव्हाण , डॉ. नामदेव कोरडे, सदाशिव सुर्यतळ, डॉ. गजाला यास्मीन, मनोज देशमुख, प्रा. नंदकुमार संवडकर, सुनील पाठक,विजय गुंडेकर, शैलेश नांदेडकर, प्रा. गोपाल भोस यांची उपस्थिती होती. शिवशंभो गौरव पुरस्कारस्थीचा सन्मान करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून पुढील तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल.

# सेनगाव तालुक्यात अनुदानाअभावी घरकुलांची कामे रखडली, आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**

सेनगाव पंचायत समिती कार्यालयात प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास विभाग नामदेव केंद्रे यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांच्या प्रलंबित अनुदानाचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला. अनुदानाअभावी घरकुलांची कामे रखडल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते हिंमत राठोड यांनी तालुक्यातील लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम वेळेवर जमा होत नसल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांना जाब विचारला तसेच आंदोलनाचा इशारा दिला.

घर बांधकाम पूर्ण होऊनही लाभार्थी आर्थिक अडचणीत का? असा थेट सवाल करत राठोड यांनी सालेगाव, केलसुला व साखरा येथील लाभार्थ्यांच्या व्यथा मांडल्या. कागदोपत्री योजना यशस्वी दाखवली जाते; मात्र प्रत्यक्षात लाभार्थी बँकांच्या फेऱ्या मारत आहेत, ही बाब गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपस्थित लाभार्थ्यांनीही आपले अनुभव मांडत अनुदान विलंबामुळे कामे ठप्प झाल्याची कैफियत मांडली. या बैठकीस लाभार्थी विनोद खणके, ज्ञानेश्वर थोरवे, विनोद चव्हाण, सुधाकर महाराज, संतोष थोरवे, आदी उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी पंधरा दिवसात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.

# एनटीसीमधील महेश उद्यान सुशोभिकरणाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ फेब्रुवारी**



शहरातील एनटीसी भागातील महेश उद्यान सुशोभिकरणाचे बुधवारी शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांच्याहस्ते थाटात उद्घाटन करण्यात आले आहे.

याप्रसंगी स्थानिक नगरसेवक रत्नाकर बांगर आणि सुमित कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रभागातील नागरिकांच्या सोयीसाठी आणि शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

नगरसेवक गणेश बांगर, राहुल बांगर, केशव दुबे, आशिष पोरवाल, मधुर भंसाळी, मुरली हेडा, शुभम मुंदडा, राजेश बालदि, रमेश झंवर, मयूर सोमाणी, अमित चांडक, गणेश काबरा, अंकित बगडिया, सुनील बगडिया, राजू कयाल, राजेश भंडारी आणि किरण कोंडेवार, महेश बियाणी, प्रवीण घुगे, दिनकर गंगावणे, एस.एम. गंगावणे, गणेश गंगावणे, कार्तिक चांडक, विवेक मालपाणी, संतोष बाहेती, संजय घन, अशोक डुब्बेवार, दिलीप झंवर, डॉ. अमोल धुमाळ, डॉ. आशतोष माहूरकर, उमेश झंवर, पवन झंवर, पंकज रायसोनी, गजानन बांगर, आणि सचिन टाक.

सुशोभीकरणामुळे एनटीसी परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि मुलांसाठी एक विरंगुळ्याचे उत्तम ठिकाण उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट वनपरिक्षेत्र चौकशी प्रकरण; शासनाच्या आदेशानंतर प्रकरणाला वेग

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १८ फेब्रूवारी-**

किनवट वनपरिक्षेत्रात सन २०२२ ते २०२५ या कालावधीत झालेल्या विविध विकासकामांतील कथित अनियमिततेबाबत चौकशी सुरू असताना, प्रहार जनशक्ती पक्ष चे किनवट-माहुर विधानसभा प्रमुख सतिश बोंतावार यांनी चौकशीला गती देण्यासाठी तृतीय स्मरणपत्र सादर केले आहे. हे स्मरणपत्र मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक कार्य आयोजना) कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे पाठविण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किनवट वनपरिक्षेत्रात विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा आरोप करत बोंतावार यांनी यापूर्वी ४ डिसेंबर २०२५ रोजी सविस्तर तक्रार अर्ज सादर केला होता. या तक्रारीत डिप सिटी, मातीबंधारे, वृक्षलागवड, बाँड्री पिलर उभारणी, वनतळे निर्मिती, सीसीटी कामे, मनरेगा अंतर्गत विविध प्रकल्प, गॅबियन बांध, चर तसेच रोपवन निर्मिती यांसारखी अनेक कामे प्रत्यक्षात न करता अथवा अपूर्ण अवस्थेत ठेवून कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता.

तक्रारीनुसार, संबंधित कामांमध्ये डीपीआरनुसार सर्वे क्रमांकानिहाय अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच मोजमाप पुस्तिका, वर्क रजिस्टर, फिल्डबुक, तांत्रिक मान्यता, डंप लेव्हल सर्वे, पाणलोट क्षेत्र मोजणी यांसारख्या अनिवार्य प्रक्रिया पाळण्यात आल्या नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी प्रत्यक्ष काम न करताच बोगस बिले सादर करून निधी उचलण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी गुत्तेदार पद्धतीने स्वतः कामे करून त्यातून वैयक्तिक आर्थिक लाभ घेतल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्यांच्या सेवा नियुक्ती, शैक्षणिक पात्रता, जात पडताळणी तसेच मालमत्ता वाढ यांचीही सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या तक्रारीची दखल घेत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाने दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी चौकशीचे आदेश निर्गमित केले होते. सदर प्रकरणाची चौकशी वनसंरक्षक (प्रा.) यांच्याकडे सोपविण्यात आली असून शासनाच्या २५ फेब्रुवारी २०१५ च्या परिपत्रकानुसार सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र, अद्याप चौकशी प्रक्रिया अपेक्षित वेगाने सुरू नसल्याचा आरोप करत बोंतावार यांनी १६ फेब्रुवारी रोजी तृतीय स्मरणपत्र सादर करून तत्काळ चौकशी पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच योग्य कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा तसेच न्यायालयीन लढा देण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे किनवट वनपरिक्षेत्रातील कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, चौकशी अहवालाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी तसेच सामाजिक संघटनांचे लक्ष लागले आहे.

# बनचिंचोली येथील जि.प. शाळा जागेच्या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे : खा. आष्टीकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ फेब्रूवारी-**



हदगाव तालुक्यातील बनचिंचोली येथील जिल्हा परिषद शाळेच्या जागेचा ताबा न्यायालयीन आदेशानुसार मूळ मालकास देण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर हिंगोली चे खा. नागेश बापूराव पाटील आष्टिकर यांनी नांदेड जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. बनचिंचोली (ता. हदगाव) येथील जिल्हा परिषद शाळा ज्या जागेवर सुरू होती, त्या जागेच्या मालकीबाबत न्यायालयात प्रकरण प्रलंबित होते. न्यायालयाच्या आदेशानुसार सदर जागेचा ताबा मूळ मालकास देण्यात आल्याने शाळेची जागा रिकामी झाली आहे. परिणामी गावातील अनेक विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळा निर्माण झाला असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. या संदर्भात खासदार नागेश पाटील आष्टिकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की,सद्यस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या विषयाची दखल घेत अनेक वर्तमानपत्रांत बातम्या प्रसिद्ध झाल्याने तालुक्यासह जिल्ह्यातही या प्रश्नाची चर्चा सुरू आहे. दरम्यान, बनचिंचोली येथील शाळेसाठी तातडीने नवीन इमारत उभारणे अथवा पर्यायी जागेची व्यवस्था करण्याबाबत निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची संयुक्त बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ नये, यासाठी प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## मराठवाड्यात माझी वसुंधरा ५ .0 मध्ये उमरी नगरपरिषद नंबर वन

**उमरी, फेब्रूवारी-** मराठवाडा छत्रपती संभाजी नगर या विभागीयस्तराव माझी वसुंधरा ५ .० अंतर्गत उमरी शहर १५ हजार लोकसंख्या गटात मराठवाड्यात नंबर वन मानाचे बक्षीसाचे मानकरी ठरले आहेत. छ .संभाजीनगर विभागात उमरी नगर परिषद प्रथम क्रमांकचे म्हणजे ७५ . लक्ष रुपयाचे बक्षीस मिळाल्याने नायगाव मतदार संघाचे विकासाचे कार्यसम्राट आमदार राजेश पवार यांनी तत्कालीन मुख्यधिकारी निलम कांबळे व नगरपरिषद सर्व टिमचे अभिनंदन केले आहे . हा गौरव सोहळा मुंबई येथे मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्री , नगरविकास मंत्री यांच्या उपस्थित दि २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. उमरी नगर परिषदेवर गेल्या पंधरा वर्षापासुन गोरठेकर यांची एक हाती सत्ता आहे . शहर स्वच्छता व पर्यावरण अशा अनेक क्षेत्रात उमरी नगरपरिषद कौतुकस्पद कामे केली आहे यंदा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीत केडी बॉस कैलास देशमुख गोरठेकर यांना युवकानी सत्ता हाती देवून हिरो बनविले आहे त्यामुळे गोरठेकर घराण्यातील तिसऱ्या पिडीला ही जनता न नाकारता एक हाती पुन्हा सत्ता दिली आहे. मुंबई येथे होणाऱ्या या सोहळ्यात मुख्यधिकारी कर्मचारी नगराध्यक्ष - सौ शकुंतला भगवान मुदिराज यांचे कैलास देशमुख गोरठेकर , राजकीय डायरेक्टर - माजी नगराधक्ष प्रविणभाऊ सारडा सर्व सन्माननिय नगरसेविका - नगरसेवक यांनी ही नगरपरिषद कर्मचारी टिमचे अभिनंदन केले आहे . हा उपक्रम उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे , तत्कालीन मुख्यधिकारी निलम कांबळे , मुख्यधिकारी गणेश चाटे यांच्या नेतृत्वाखाली उमरी नगरपरिषदेने माझी वसुंधर अभियानात ५.० उत्तम कामगीरी बजावली आहे . तत्कालीन पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता अरविंद बाराते ,कार्यालीन अधिक्षक कांचन पडलवार, नगर अभियंता कैलाश येमेलवाड, लेखापाल बालाजी चवरे, संगणक अभियंता विनोद सावंत, पूजा पावडे रचना सहाय्यक, वरिष्ठ लिपिक गणेश मदने, वरिष्ठ लिपिक सचिन गंगासागरे, सत्यनरायण पिंडकुरवार,लिपिक सुर्यकांत माळवतकर, लिपिक गंगाधर पवार, शंकर पाटील, पंडित जाधव,रमाबाई करपे, पंडित जाधव, शंकर माने, मुकादम चंद्रकांत श्रीकांबळे, आकाश खंदारे,पिराजी गायकवाड,नरेंद्र खंदारे,शकील पठाण,अंकुश सवई बालाजी खंदारे, मिलिंद सवई,शहनाज बेग,सुनंदा खंदारे, हमीद बेग,सुरेश मुदिराज,माधव जाधव,सदानंद गायकवाड सर्व घनकचरा कर्मचारी नगर परिषद उमरी यांनी परिश्रम घेतले आहे.



## जानापुरीत कालव्याच्या कामाची चौकशी करण्याची ग्रामपंचायतची मागणी

**सोनखेड-**जानापुरी परिसरातील विष्णुपुरी शाखा क्रमांक ८ कालव्यावरील सुरू असलेल्या दुरुस्ती कामात गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप करत ग्रामपंचायत जानापुरीच्या वतीने पाटबंधारे विभाग (उत्तर) नांदेड येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले आहे. संबंधित काम तात्काळ थांबवून सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष सदाशिवराव कदम यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संबंधित कालवा हा परिसरातील शेतकऱ्यांसाठी जीवनदायी असून हजारो एकर शेती या कालव्यावर अवलंबून आहे. मात्र सध्या सुरू असलेले दुरुस्ती काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून तांत्रिक निकष व शासनमान्य अंदाजपत्रकाच्या विरोधात केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. कालव्यातील गाळ योग्य नियोजन न करता सरळ रस्त्यावर टाकण्यात येत आहे. त्यामुळे पावसाळ्यात चिखल साचून वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची तसेच अपघाताची शक्यता आहे. अंदाजपत्रकानुसार कालव्याची लांबी, रुंदी व खोली राखली जात नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीत स्पष्ट होत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. याशिवाय काँक्रीटीकरणाच्या कामात आवश्यक त्या प्रमाणात सिमेंट, जाडी व मजबुती राखली जात नसून केवळ दिखाव्यापुरते काम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित अधिकाऱ्यांची देखरेख नसल्याने काम नियमबाह्य पद्धतीने सुरू असल्याचेही ग्रामपंचायतीने म्हटले आहे. निकृष्ट दर्जाचे काम तात्काळ थांबविण्याचे आदेश द्यावेत,स्वतंत्र व सखोल तांत्रिक चौकशी समिती नेमावी,मंजूर अंदाजपत्रक व प्रत्यक्ष कामाची तुलना करून अहवाल सादर करावा,दोषी अधिकारी व कंत्राटदारांवर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी,कालव्याचे काम दर्जेदार व पारदर्शक पद्धतीने पुन्हा करावे. प्रशासनाने त्वरित स्थळ पाहणी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

## ग्रामीण भागात रमज़ानची पूर्वतयारी पूर्ण;आजपासून पवित्र रोजास प्रारंभ

**आदमपूर-**बिलोली तालुक्यातील आदमपूर गाव परिसरातील ग्रामीण भागात रमज़ान मासारंभाची सर्वत्र पूर्ण तयारी झाल्याचे चित्र आहे. विश्वबंधूता आणि शांततेचा संदेश देणाऱ्या मुस्लिम धर्माचे संस्थापक हज़रत मोहम्मद पैगंबर सल्लालाहु व अलैहिव सल्लम यांच्या आचरणानुसार प्रत्येक मुस्लिम बांधव या पवित्र महिन्याचे काटेकोर पालन करीत असतात. सगळीकडे संपूर्ण महिन्याचे नियोजन आखीव रेखीव बांधव केल्याचे ठिकठिकाणी गाव परिसरात पहायला मिळते आहे.या महिन्याचे स्वागत करण्यासाठी हाफिज, मौलाना,अबालवृध्द, महिला,बालक सज्ज झाले आहेत.बुधवार दि.१८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मगरिबच्या वेळेस चंद्रदर्शन झाल्यानंतर उपवास सुरू झाल्याची घोषणा मस्जिदमधून केली जाते. गुरूवार दि.१९ फेब्रुवारी पासून रोजा(पविञ उपवास) पर्वास प्रारंभ होत आहे.त्या त्या गाव परिसरातील मस्जिद मधून संबंधित समुदायास आदल्यादिवशी अवाहन करण्यात येते.

# गोदावरी अर्बनचा प्रवास सहकरातून समृद्धीकडे : मुरलीधर मोहोळ

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ फेब्रूवारी-**



सहकार क्षेत्रातील विश्वासाचे प्रतीक ठरलेल्या गोदावरी अर्बनच्या विस्ताराच्या वाटचालीत ऐतिहासिक टप्पा गाठत गुजरातची राजधानी अहमदाबाद येथे शतकी शाखा सुरू केली. या शाखेचे उद्घाटन केंद्रीय सहकार तथा नागरी हवाई वाहतूक मंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. गोदावरी अर्बनच्या प्रवासातील हा क्षण संस्थेसाठी अभिमानास्पद ठरला.

या सोहळ्यास माजी राज्यसभा खासदार मा. जुगलजी ठाकूर,बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचे माजी अध्यक्ष दिना मेहता,गुजरात स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष मा. अजयजी पटेल,चेंबर ऑफ कॉमर्सचे सचिव मा. सुधांशूजी मेहता, गुजरात को-ऑप सोसायटीज फेडरेशन चे अध्यक्ष मा. घनश्यामजी अमिन, तसेच भारत सरकार नियामक मंडळाचे सदस्य राष्ट्रीय मस्त्य व्यवसाय विकास मंडळ डॉ. मनोजजी शर्मा यांची प्रमुख उपस्थिती लाभलीउद्घाटन प्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, गोदावरी अर्बनची १०० वी शाखा गुजरातमध्ये माझ्या हस्ते सुरू होत आहे, ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. देशात सहकार क्षेत्राचा विस्तार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मोठा पुढाकार घेतला आहे. गोदावरी अर्बनने कमी कालावधीत यशाच्या अनेक पायऱ्या गाठल्या असून ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांसाठी गोदावरी अर्बनचा प्रवास सहकारातून समृद्धीच्या दिशेने सुरू आहे. या प्रवासाच्या पुढील वाटचालीस मनापासून शुभेच्छा.

यावेळी उपस्थित जुगल ठाकूर म्हणाले, हेमंत पाटील आणि मी लोकसभेत एकत्र काम केले आहे. अनेक समित्यांमध्ये आम्ही सोबत कार्य केले. ते अभ्यासू व्यक्तिमत्व आहेत हे मला माहीत होते, मात्र सहकार क्षेत्रात त्यांनी इतके मोठे कार्य उभे केले आहे हे आज प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले. गोदावरी अर्बनच्या माध्यमातून त्यांनी लोकांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. दिना मेहता म्हणाले, भारत चौथी आर्थिक सत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, मात्र दरडोई उत्पन्न अजूनही कमी आहे. ते वाढवण्यासाठी गोदावरी अर्बन उल्लेखनीय कार्य करत आहे.

कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष राजश्री पाटील यांनी सांगितले, गुजरातने सहकार क्षेत्राला नवी उंची देण्याचे काम केले आहे. विकसित शहर म्हणून अहमदाबादकडे देशाचे लक्ष आहे.त्यामुळेच गोदावरी अर्बनची शाखा येथे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्राहकांच्या विश्वासामुळेच आज आम्ही हा यशस्वी प्रवास करत आहोत.सहकार क्षेत्रातील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहू असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

डॉ. मनोज शर्मा म्हणाले, गोदावरी अर्बनची सुरुवात एका शाखेपासून झाली आणि आज ती शंभर शाखांपर्यंत पोहोचली आहे. बँकिंग व आर्थिक व्यवहारांशिवाय देशाची प्रगती शक्य नाही.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सांगितले, गोदावरी अर्बनची १०० वी शाखा अहमदाबाद येथे सुरू होत आहे, याचा आम्हाला अत्यंत आनंद आहे. ग्राहकांसाठी अत्याधुनिक सेवा-सुविधांसह ही शाखा कार्यान्वित करण्यात आली आहे.

गोदावरी अर्बनच्या शंभराव्या शाखेच्या उद्घाटनाने संस्थेच्या प्रगतीच्या वाटचालीत नवा अध्याय सुरू झाला असून, सहकार क्षेत्रातील सेवा अधिक व्यापक करण्यासाठी हा टप्पा प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक नामदार हेमंत पाटील, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, संचालक वर्षा देशमुख, साहेबराव मामिलवाड, अजय देशमुख सरसमकर,स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष विशाल दवे,

मेरुभाई अलगोतर हार्दिक नगर,रोहन हिराणी,भीस्म शाह,अनुज शहा,अंकुर शहा ,उपसरव्यवस्थापक रवि इंगळे , उपसरव्यवस्थापक विजय शिरमेवार,वरिष्ठ व्यवस्थापक महेश केंद्रे , अहमदाबाद शाखा व्यवस्थापक अंकुश बिबेकर ,आय टी व्यवस्थापक पवन यादव,वाणिज्य व्यवस्थापक प्रशांत कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# १९१ कोटी रुपयांच्या रस्ते विकास कामांचे आ. चिखलीकर यांच्या हस्ते २० रोजी भूमिपूजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ फेब्रूवारी-**

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील विविध रस्ते विकास कामांचे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे हस्ते दिनांक २० फेब्रुवारी रोजी भूमिपूजन करण्यात येणार आहे . दुपारी एक वाजता हिरा बोरी तांडा फाटा नांदेड माळेगाव रोड ता . लोहा येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात १९१ कोटी ५१ लक्ष रुपयांच्या रस्त्याच्या विकास कामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे .

यावेळी भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष प्रणिताताई देवरे चिखलीकर ,राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर , एडवोकेट मुक्तेश्वर धोंडगे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार , उपनगराध्यक्ष शेख करीम , गटनेता भास्कर पवार , माणिकराव मुकदम , किरण वाटमवार माजी माजी नगराध्यक्ष न.प.लोहा , आनंदराव पाटील ढाकणीकर माजी उपसभापती पंचायत समिती लोहा, छत्रपती स्वामी तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस लोहा , मनोहर पाटील भोसीकर तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस कंधार , दत्ता वाले माजी उपसभापती न प लोहा , रोहित पाटील माजी उपसभापती प.स. लोहा , हनुमंत धुळगंडे सरपंच माळेगाव यात्रा , चंद्रमुनी मस्के माजी जिल्हा परिषद सदस्य , नारायण जाधव, अर्जुन राठोड, संतोष (नाना) तिडके, बाळू बाबर , माधव जाधव, परमेश्वर मिरकुटे , प्रभाकर सुरनर, रेखा रामकिशन सुरनर सरपंच घोटका , राजू जाधव यांच्यासह अनेकांची उपस्थिती राहणार आहे.

दरम्यान लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात रस्ते विकासाचे मजबूत जाळे विणण्याचे काम आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याकडून सुरू आहे. ग्रामीण भागात दळणवळणाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याशिवाय ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होणार नाही. याची खात्री असलेले आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी प्रत्येक गावाला पक्का रस्ता देण्याचा संकल्प केला आहे. याच अनुषंगाने हिराबोरी तांडा - डोंगरगाव - घोटका -कुरुळा- उमरगा -गुंटूर -वरताळा- वसंतनगर या राज्य महामार्ग क्रमांक ३६१ ते एस एस क्रमांक १६ पर्यंत ४२ किलोमीटर अंतराचे काम करण्यात येणार आहे. साईड शोल्डरसह रस्त्याचे दुपदरीकरण करण्यात येणार असल्याने या भागातील रस्ते विकासाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे.अशी माहिती आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली आहे.

# मुदखेड शहरामध्ये शंकर कन्स्ट्रक्शनच्या बोगस कामाचा सुळसुळाट

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १८ फेब्रूवारी-**



मुदखेड नगरपरिषदेच्या निवडणुकांचे वारे ओसरताच शहरात 'विकास कामां'च्या नावाखाली बोगस कामांना ऊत आला आहे. भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड,अर्धापूर आणि भोकर या तिन्ही तालुक्यांत सध्या शंकर कन्स्ट्रक्शन या कंपनीच्या माध्यमातून अनेक कामे सुरू आहेत. मात्र, ही कामे तांत्रिक निकषांना तिलांजली देऊन केली जात असल्याचा गंभीर आरोप नागरिक करत आहेत.मुदखेड शहरातील गुजरी (कुरेशी गल्ली) मोहल्ला परिसरात सध्या सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, हे काम करताना शासनमान्य 'इन्स्ट्रुमेंट' (तांत्रिक निकष) आणि आराखड्यानुसार केले जात नसल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. रस्ते कामात वापरले जाणारे साहित्य आणि कामाचा दर्जा अतिशय सुमार असून, हा रस्ता टिकणार की पहिल्याच पावसात वाहून जाणार? असा संतप्त सवाल स्थानिक जनता विचारत आहे.आमदारांच्या वरदहस्तामुळेच 'बोगस' कारभार?

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, शंकर कन्स्ट्रक्शन ही कंपनी स्थानिक आ. श्रीजया चव्हाण यांच्या अत्यंत जवळची असल्याचे बोलले जात आहे. लोकप्रतिनिधींच्या जवळच्या कंत्राटदाराला काम मिळाल्यामुळे संबंधित विभागाचे अधिकारीही याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची चर्चा शहरात वारंवार होत आहे. सत्ताधाऱ्यांचे पाठबळ असल्यामुळेच कंत्राटदाराने नियम धाब्यावर बसवले आहेत का? अशी शंका आता उपस्थित केली जात आहे.

नागरिकांमध्ये संतापाची लाट शासनाचा करोडो रुपयांचा निधी अशा प्रकारे निकृष्ट कामांतून वाया जात असल्याने मुदखेडकरांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. जर ही कामे दर्जेदार होणार नसतील, तर अशा विकासकामांचा फायदा कोणाला? केवळ कंत्राटदाराचे खिसे भरण्यासाठीच हा घाट घातला गेला आहे का? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.या बोगस कामांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी व्हावी आणि निकृष्ट काम करणाऱ्या 'शंकर कन्स्ट्रक्शन'वर कठोर कारवाई करावी, व काळया यादीत टाकण्यात यावे अन्यथा जनआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# धनेगावकरांनी महामार्गावरील मागितलेले बोगदे रद्द होणारच नाहीत : आ.बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड , दि. १८ फेब्रूवारी-**



धनेगाव येथून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ डेअरी ते वाजेगाव बायपास पर्यंत धनेगावकरांना महामार्गाच्या पलीकडील बाजूस स्मशानभूमी, देवस्थान, मुजामपेठ वस्ती व तसेच शेतीसाठी ये-जा करण्यासाठी महामार्गावरून जाताना अपघाताचा धोका असल्याचे लक्षात घेऊन पाच ठिकाणी बोगद्याची मागणी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याकडून मंजूर करून घेण्यात आले होती. पण काही व्यवसायिकांनी स्वार्थापोटी वरील तीन बोगदे ना मंजूर करण्याची ही मागणी अशोकराव चव्हाण यांच्याकडे करण्यात आली. यासंदर्भात माजी जि. प. सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १८ फेब्रुवारी रोजी गावकऱ्यांसोबत दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांची भेट घेऊन चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार बोंढारकर यांनी ठणकावून सांगितले की वरील मंजूर केलेले बोगदे रद्द होणारच नाहीत.

धनेगाव येथील महामार्ग क्रमांक ३६१ वरील धनेगाव येथील नागरिकांनी धनेगावकराना हा महामार्ग पार करून जाणे सुरक्षित नाही. तेव्हा डेअरी ते धनेगाव वजेगाव बायपास पर्यंत पाच बोगद्याची मागणी धनेगावकरांनी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याकडून मंजूर करून घेतली होती. पण काही व्यवसायिकांनी आपल्या व्यवसायाच्या स्वार्थापोटी पाच बोगदे नको दोन बोगदे द्या अशी मागणी लावून धरून धनेगावकर यांच्या सोयीचे न पाहता; आपल्या व्यवसाय विषयक स्वार्थी धोरण आखून पाच बोगद्यस विरोध होत आहे. असे या बैठकीत आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्याशी चर्चा झाली. तेव्हा आमदारांनी सांगितले की तुम्ही मागितलेले पाच बोगदे रद्द करण्यात आले नाहीत तात्पुरत्या स्वरूपात काम चालू करून वरील सर्वच बोगदे होतील असे त्यांनी बैठकीत सांगितले. वरील बोगद्याच्या संदर्भात माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी या बैठकीत सांगितले की आमचा वैयक्तिक काही संबंध नसून गावकऱ्यांच्या हितासाठी व सोयीसाठी आमची मागणी आहे. यासाठी आम्ही शासकीय, राजदरबारी हा प्रश्न लावून धरून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण व शासकीय अधिकारी तसेच संबंधित गुतेदार यांची बैठक घेऊन वरील पाच बोगदे मंजूर करून घेतले आहेत. तेव्हा हे बोगदे या ठिकाणी झालेच पाहिजे नाहीतर धनेगाव ची सर्व रहिवासी नागरीक दिनांक ५ मार्च रोजी जिल्हा अधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार असल्याचेही आमदार बोंढारकर यांना बैठकीत सांगितले. यासंदर्भात व्यावसायिकांचे स्वार्थापोटी या बोगद्यास विरोध असल्याचे सांगितले तर आम्ही जनहिताच्या सुविधासाठी लढत आहोत असेही मनोहर पाटील यांनी सांगितले आणि याकडे एकमेका विरुद्ध गटांचा विचार न करता राजकीय नेते मंडळी व प्रशासनाने सामान्य जनतेच्या हिताचा न्याय द्यावा अशी मागणी मनोहर पाटील शिंदे यांनी आमदार आनंदराव बोंढारकर यांच्याकडे केली. यावेळी गंगाधर कवाळे, निलेश भालके, टबेस देशमुख, रंणजीत सूर्यवंशी, माधव गुडेवार, दिलीप गजभारे, तातेराव ढवळे, रमेश वाघमारे, अब्दुल गफूर, रामजी वाघमारे, राजेश बोटलावार, शिवाजी बुचडे, संग्राम निलपत्रेवार, शैलेंद्रसिंह ठाकूर, मोहम्मद रफी अहेमद, शेख गफुर, भगवान कवाळे, लक्ष्मण गजभारे, नारायण कवाळे, बळी शिंदे, कोंडीबा कवाळे, गुलाब गायकवाड, माधव देशमुख, शिवानंद कवाळे, परमेश्वर देशमुख ,शेख अहमद, शेख तयब,मुखीद पठाण, इरफान शेख जानी मुक्ती साहब यांच्यासह धनेगाव येथील शेकडो गावकऱ्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वाळू उपशासाठी परराज्यातील मजुर गौडगावात झाले दाखल

**विशेष प्रतिनिधी**

**परभणी ,/प्रतिनिधी-** गोदावरी नदीच्या पात्रातून अवैध वाळू उपसा जोर धरून सुरू असल्याचे चित्र आहे. या ठिकाणी तराफा आणि फराड्यांच्या साहाय्याने परराज्यातील मजूर आणून वाळू चोरी करण्यात येत असल्याची बाब समोर आली आहे. या मजुरांचे चारित्र्य प्रमाणपत्र किंवा पोलिस वेरिफिकेशन झाले आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला असून, पोलिसांकडे त्यांची नेमकी माहिती आहे का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गौडगाव हे परराज्यातील एक प्रमुख केंद्र ठरले आहे, जेथे गोदावरी नदीच्या विस्तीर्ण पात्रातून वाळू उपसा करून स्थानिक बाजारपेठेत विक्री करण्यात येते. येथे ट्रॅक्टर, टेम्पो आणि बोटींच्या मदतीने दिवसा-रात्र अवैध वाळू वाहतूक चालू आहे. विशेषतः पाणीटंचाईमुळे उघड्या पडलेल्या नदीपात्रात भरदिवसा वाळू चोरांची जत्रा सुरू असल्याचे दिसून येते. या



कामासाठी परराज्यातील मजूर तराफ्यांद्वारे आणले जातात, जे कोणत्या राज्यातून आले आहेत याची स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. या मजुरांची पार्श्वभूमी संशयास्पद असू शकते. ते उत्तर प्रदेश, बिहार किंवा इतर राज्यांतून असण्याची शक्यता आहे, परंतु पोलीस वेरिफिकेशन नसल्याने गुन्हेगारी घटनांशी त्यांचा संबंध असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिक ग्रामस्थांमध्ये याबाबत तीव्र असंतोष आहे.वाळू माफियांच्या जाळ्यात अडकलेल्या या मजुरांमुळे नदीपात्राचे पर्यावरणीय नुकसान होत असून, शासनाच्या कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. मागील काळात गोदावरी नदीत अनेक ठिकाणी अवैध वाळू उपसावर कारवाई झाली आहे. मात्र, गौडगावात अशी कारवाई अद्याप होईपर्यंत नाही. गोदावरी नदी ज्याला दक्षिण गंगा म्हणून ओळखले जाते, ही महाराष्ट्रातील प्रमुख नदी आहे. तिच्या पाणलोट क्षेत्रात अनेक पाटबंधारे प्रकल्प आहेत, परंतु वाळू उपसामुळे नदीची जैवविविधता धोक्यात सापडली आहे. ग्रामस्थ आणि पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाकडे कारवाईची मागणी केली असून, परराज्यातील मजूरांची पार्श्वभूमी तपासण्याची गरज अधोरेखित केली आहे.

पोलिस विभागाने या मजुरांची यादी तयार करून चारित्र्य प्रमाणपत्र तपासावे आणि वाळू माफियांवर अंकुश लावावा, अशी अपेक्षा आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने कारवाई करून या प्रकरणाचा खुलासा करावा, अन्यथा अवैध वाळू उपसाचा धंदा आणखी जोर धरेल. गौडगाव आणि गोदावरी खोऱ्यातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी हे अत्यावश्यक आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### पतंजलीचा मध बोगस?

**अवघ्या १५ दिवसांत मध झाला साखर; ग्राहक पंचायतची अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार**




**सेलू,/प्रतिनिधी:-** सेलू येथून एक धक्कादायक प्रकार समोर आला असून अखिल भारतीय ग्राहक पंचायत चे देवगिरी प्रांताध्यक्ष डॉ. विलास मोरे यांनी पतंजली कंपनीच्या मधाबाबत गंभीर तक्रार दाखल केली आहे.

डॉ. मोरे यांनी पंधरा दिवसांपूर्वी सेलू येथील पतंजली स्टोअरमधून एक किलो पॅकबंद मध खरेदी केला होता. त्यातील सुमारे अर्धा किलो मध वापरल्यानंतर उर्वरित अर्धा किलो मध पूर्णपणे गोठून साखरेसारखा झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अवघ्या १५ दिवसांत मध साखरेसारखा होणे म्हणजे तो शुद्ध नसून साखर मिश्रित असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.साखर झालेला मध संबंधित दुकानदार परमेश्वर गजमल यांना दाखवण्यात आला असता त्यांनी वरिष्ठ एजन्सीशी संपर्क साधून पुढील कारवाई करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, ''आमचा मध पूर्णपणे प्युअर आहे'' असे सांगून ग्राहकांना साखर मिश्रित बोगस मध विकला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या विश्वासाला तडा गेला असून संबंधित उत्पादनामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

याप्रकरणी डॉ. विलास मोरे यांनी अन्न व औषध प्रशासन चे उपायुक्त श्री. चौधरी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून प्रशासनाकडून पुढील तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.या प्रकरणामुळे पतंजली उत्पादनांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तपासाअंती सत्य समोर येण्याकडे ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

### घरफोडी प्रकरणातील आरोपी ताब्यात

**सेलू,/प्रतिनिधी:-** सेलू शहरातील सह्याद्रीनगर येथे मागील मंगळवारी (दि. १०) अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा घरफोडी करून रोख रक्कम आणि दागिने लंपास केल्याची घटना घडली होती. या घरफोडीतील आरोपींना पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि सेलू पोलिसांनी कारवाई करत ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून या प्रकरणातील तब्बल ६ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

भरदिवसा घडलेल्या या घडफोडी प्रकरणी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखा आणि सेलू पोलिसांचे पथक तयार करून रवाना करण्यात आले होते. या पथकाने आरोपी रविंद्रसिंग रणजीतसिंग टाक (वय २२, रा.आठवडी बाजार मानवत) यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने इतर दोन साथीदार असल्याची कबुली दिली. तसेच त्याच्याकडून घरफोडी प्रकरणातील सहा लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये चार तोळे वजनाच्या दोन पाटल्या, एक तोळा वजनाची अंगठी, पाच ग्रॅम वजनाचे कानातील दागिने, आणि ४० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण सहा लाख दोन हजार रुपयांचा मुद्देमाल आरोपी रविंद्रसिंग रणजित सिंग टाक याच्याकडून हस्तगत केला आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सेलू पोलिसांचे पोलीस निरीक्षक दीपक बोरसे, सहायक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप, सहायक पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव केंद्रे, पोलीस हवालदार निलेश भुजबळ, विलास सातपुते, पांडुरंग तूपसुंदर, मुकेश बुधवंत, सुलक्षण शिंदे, गणेश कौटकर, इंद्रजीत बावरी, नरहरी उंबरवाड, मोहन लाड, ज्ञानेश्वर निळे, महिला पोलिस अंमलदार अनिता राठोड, जयश्री आव्हाड, मधुकर ढवळे, परसराम गायकवाड, आनंद पांचाळ आणि सेलू पोलिसांचे पोलीस उपनिरीक्षक शेख, पोलीस उपनिरीक्षक राऊत यांच्या पथकाने मिळून केली.

### शिवजयंतीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क; सेलूत शांतता कमिटीच्या बैठकीत सलोख्याचा निर्धार



**सेलू,/प्रतिनिधी:-** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर सेलू शहरात शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने शांतता कमिटीची बैठक सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी पोलीस स्टेशनच्या सभागृहात आयोजित करण्यात आली.

बैठकीस पोलीस निरीक्षक दीपक बोरसे, ग्राहक पंचायतचे प्रांताध्यक्ष डॉ विलास मोरे, पोलीस कॉन्स्टेबल सुभाष ढाले, पोलीस कॉन्स्टेबल कुंडलीक साबळे त्यांचेसह शिवप्रतिष्ठान शिवजयंती मंडळ, वालूर शिवजयंती मंडळ, चिकलठाणा शिवजयंती मंडळ, वाघ पिंपरी शिवजयंती मंडळ, नुतन महाविद्यालय शिवजयंती मंडळ, बोर्डीकर कृषी महाविद्यालय शिवजयंती मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीत शिवजयंती महोत्सव पारंपरिक उत्साहात आणि बंधुभावाने साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले. मिरवणुकीचे मार्ग, ध्वनीप्रदूषण नियंत्रण, वेळेचे नियोजन तसेच संवेदनशील भागात विशेष पोलीस बंदोबस्त याबाबत सविस्तर चर्चा झाली.

यावेळी पोलीस निरीक्षक दीपक बोरसे म्हणाले की सोशल मीडियावर अफवा किंवा भडकावू संदेश पसरवू नयेत, कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास त्वरित प्रशासनाला कळवावी. डॉ. विलास मोरे म्हणाले की सर्व धर्मियांनी परस्पर सहकार्य व संयम राखून सण साजरे करावेत, यावर सर्वानुमते भर देण्यात आला. बैठकीच्या शेवटी उपस्थितांनी सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

### अकोला-खंडवा गेज परिवर्तन प्रकल्पाला गती

**परभणी,/प्रतिनिधी:-** अकोला-खंडवा गेज परिवर्तन प्रकल्पांतर्गत एक महत्त्वाचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. अमलाखुर्द-टुकाईथाड विभागात तापी नदीवरील महत्त्वाच्या पुल क्रमांक ६२७/१ च्या सुपरस्टक्चरचे यशस्वी लाँचिंग करण्यात आले आहे. या पुलात ४ ७६.२ मीटर आरडीएसओ मानक ओपन वेब गर्डर्स आहेत. लाँचिंग नोज पद्धतीमुळे नदीपलीकडे गर्डर्स सुरक्षित व कार्यक्षमरीत्या बसविता आले आणि आरडीएसओ मानके तसेच सर्व सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले. ही कामगिरी अभियंते व प्रकल्प पथकांच्या समर्पणाचे, तांत्रिक कौशल्याचे आणि समन्वयित कार्याचे उत्तम उदाहरण आहे.



### पाणीपट्टी व मालमत्ता कर एकरकमी भरणाऱ्यांना विलंब शास्तीत १०० टक्के सूट :

**महानगरपालिकेचा निर्णय : आयुक्तांद्वारे पत्रक : कर भरण्याचे महापौर, उपमहापौर व आयुक्तांद्वारे आवाहन**

**परभणी,/प्रतिनिधी :** १९ फेब्रुवारी ते १० मार्च २०२६ या कालावधीत चालू आर्थिक वर्षापर्यंतची पाणी पट्टी व मालमत्ता कर एकरकमी भरणाऱ्या मालमत्ता धारकांना विलंब शास्तीत १०० टक्के सूट असणारी अभय योजना महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केली आहे.

महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली कार्यवाही चालू आहे. मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली अधिक चांगल्या पद्धतीने होणे आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका आयुक्तांना स्वेच्छा निर्णयानुसार महानगरपालिका अधिनियमातील कलम १२८-अ, अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ५१ मध्ये नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी वसुलीचा पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल अशी तरतुद आहे. त्यानुसार आयुक्त नितीन नार्वेकर यांनी १७ फेब्रुवारी रोजी आदेश पारीत करून १९ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत चालू आर्थिक वर्षापर्यंतची पाणीपट्टी व मालमत्ता कर एकरकमी भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना विलंबशास्तीत १०० टक्के सुट अभय योजना जाहिर केलेली आहे.

या अभय योजनेचा लाभ घेत नागरीकांनी मालमत्ता कर व पाणी पट्टीचा भरणा करावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने महापौर सय्यद एकबाल सय्यद खाजा, उपमहापौर गणेश सुरेशराव देशमुख व आयुक्त नितीन नार्वेकर यांनी केले आहे.



### ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या चिमुकल्यांनी मिळविले संगीत परीक्षेत घवघवीत यश

**परभणी,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई अंतर्गत संगीत कलेच्या गायन वादन विषयाच्या प्रारंभिक, प्रवेशिका प्रथम परीक्षांचे निकाल प्रदर्शित झाले आहेत.

या परीक्षेत रायरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धर्मापुरी ५वी ते ८वी सेमी विभागातील प्रारंभिक परीक्षेसाठी गायन व वादन प्रकारात २८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.त्यापैकी ५ विद्यार्थी १९ विद्यार्थी मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. त्याच बरोबर प्रवेशिका प्रथम परीक्षेसाठी ०७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी व ५ विद्यार्थी मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्था अध्यक्ष प्राध्यापक किरण सोनटक्के सर व संस्थेच्या सचिव सोनटक्के मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे व संगीतशिक्षक यांचे विशेष अभिनंदन व कौतुक केले.

### बुन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

जिंतूर /प्रतिनिधी - शहरातील बुन इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात अल्मंड फंक्शन हॉल येथे संपन्न झाले यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण,करून उपस्थितीतांचे मन जिंकले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्रा. शेख इसाक , प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.जुनेदखान , अहेमद सिद्दीकी सर, नफिस मामू, सिराज सिद्दीकी, शेख रहीम पत्रकार अदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते




कार्यक्रमाच्या प्रस्ताविक शाळेचे संस्था अध्यक्ष अहेमद सिद्दीकी यांनी पालकांनी शिक्षणाला प्राधान्य दियावे तसेच बुन इंग्लिश स्कूल येथे दर्जेदार शिक्षण देऊन विद्यार्थीना उच्चशिक्षित करण्यासाठी शाळेतील शिक्षिका व शिक्षक भरपूर परिश्रम घेत असल्यामुळे त्यांनी त्यांचे कौतुक केले शाळेची शैक्षणिक उन्नती व भरारीसाठी परिश्रम घेत असल्यामुळे समाधान व्यक्त केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उकाशा मॅडम यांनी केले, तर आभार प्रदर्शन महेविश सिद्दीकी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाहीन मॅडम, शहेबाज सर,तबस्सूम मॅडम, शिजा मॅडम,निलोफर मॅडम, समरीन मॅडम, महेविश मॅडम यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास पालकांनी मोठा सहभाग नोंदविला.

### पूर्णेत गाईने दिला जुळ्या वासरांना जन्म

**गायीसह दोन्ही वासरांची प्रकृती एकदम ठणठणीत**

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :-**एका गावरान गाईनी जुळी वासरे जन्माला घातली. गाई सहसा एकाच वासराला जन्म देतात, परंतु,अशा प्रकारची घटना ही दुर्मीळ असल्याचे म्हंटले जाते. सध्या दोन्ही वासरे ठणठणीत आहेत. परिसरात गायीला जुळी वासरे झाल्याचे कळताच बघ्यांनी गर्दी केली आहे.

पूर्णा तालुक्यांतील मुंबर गावातील अल्पभूधारक शेतकरी तुकाराम भीमराव शिंदे यांनी बऱ्याच दिवसापासून सांभाळलेल्या गाईला जुळी वासरे जन्माला आली आहेत.जोडव्यवसाय म्हणून ते गाई बऱ्याच दिवसापासून सांभाळत आहेत.वडिलोपार्जित शेतीजमीन असल्याने गाई वासरे सांभाळणे हा एक त्यांचा छंद आहे. गाईने नुकताच एकाच वेळी दोन वासरांना जन्म दिला. ही दोन्ही वासरे सारख्या रंगांची आहेत. याअगोदर मात्र अशा प्रकार कधी घडलेला नाही . दोंन्ही वासरे व गाय सुदृढ व सुखरुप



एकाच वेळी दोन वासरे जन्माला येणे ही लाखातील एखादी घटना असल्याचे पूर्णा येथील पशु वैद्यकीय अधिकारी कचरे यांनी सांगितले. दोन्हीं वासराची काळजी ७२ तास घेणे योग्य राहील सकस आहार, योग्य निगा आणि वेळेवर दूध औषधोपचार करणे गरजेचे आहे. परिसरात गायीला जुळी वासरे झाल्याची वार्ता पसरताच बघ्यांनी पहाण्यासाठी एकच गर्दी केली होती.

### दोन शासकीय कार्यालयात चोरीचा प्रयत्न; सुरक्षा ऐरणीवर



**मानवत,/प्रतिनिधी-** येथील तालुका भूमी अभिलेख कार्यालय आणि दुय्यम निबंधक (रजिस्ट्री) कार्यालयामध्ये १६ फेब्रुवारीच्या मध्यरात्री अज्ञातांनी चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी दोन्ही कार्यालयांचे मुख्य कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि कपाटे फोडली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

मानवत तहसील परिसरात भूमी अभिलेख व दुय्यम निबंधक कार्यालय आहेत. मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे कर्मचारी कार्यालयात आले असता त्यांना दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. आत जाऊन पाहणी केली असता कार्यालयातील कपाटे तोडल्याचे निदर्शनास आले. कार्यालयात चोरट्यांना रोकड मिळाली नसल्याने रिकाम्या हाती परतावे लागले. दरम्यान, कोणतीही महत्त्वाची वस्तू किंवा ऐवज चोरीला गेला नसल्याचे सांगण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच दुय्यम निबंधक सुनील गायकवाड आणि भूमी अभिलेख कार्यालयाचे अधिकारी दत्ता खुणे यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. याप्रकरणी मानवत पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. दोन्ही कार्यालयात सीसीटीव्ही उपलब्ध नाहीत.

### कर्मचाऱ्यांचा प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत बंदचा इशारा

**मानवत ,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकारने तातडीने लक्ष न दिल्यास २३ फेब्रुवारी २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्याचा इशारा जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना यांच्या वतीने देण्यात आला आहे.

संघटनेने पंचायत समिती, मानवत येथे दिलेल्या निवेदनात १६ ते २२ फेब्रुवारी दरम्यान काळ्या फिती लावून काम करत निषेध नोंदविण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. त्यानंतरही मागण्या मान्य न झाल्यास २३ फेब्रुवारीपासून पूर्ण कामबंद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. प्रमुख मागण्या काय? संघटनेने शासनाकडे पुढील महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत, चौथ्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करणे, पदनाम बदल व पदोन्नतीतील साखळी कमी करणे, सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, १नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या नियुक्तींना जुनी पेन्शन देणे, जिल्हा परिषद व जलसंधारण विभागातील कर्मचाऱ्यांचे समायोजन करणे टप्प्याटप्प्याने आंदोलन संघटनेने आंदोलनाची रूपरेषाही जाहीर केली आहे १६ ते २२ फेब्रुवारी : काळी फित लावून काम १७ते २० फेब्रुवारी : निवेदन, घोषणाबाजी व लक्षवेधी आंदोलन २३ फेब्रुवारीपासून : बेमुदत कामबंद संघटनेचे पदाधिकारी यांनी सांगितले की, शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्यामुळे आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. मागण्या मान्य झाल्यास आंदोलन मागे घेतले जाईल; अन्यथा राज्यभर तीव्र स्वरूप धारण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.पंचायत समिती मानवत येथे देण्यात आलेल्या निवेदनावर डी.बी साबळे, एस आर पितळे, जी यु सोळंके ,एस पी रुमणवाड



,व्ही एन झुकटे, एन.एन राऊत ,जी डी मगर, ए एन साळवणे, एस बी अंभोरे, ए टी घटे , एस एन गाडे , सदानंद खंदारे व वर्षा झाडे आधी कर्मचाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.